म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक........
दा. क्र. २९८६३

IRBK-0121863



# मी स्वामी या देहाचा

अनिल बर्वे

IRBK-0121863

*अनिल बर्वे यांचे इतर प्रकाशित साहित्य*

**कादंबरी**

थँक यू मिस्टर ग्लाड
डोंगर म्हातारा झाला
स्टड फार्म
अकरा कोटी गॅलन पाणी
आतंक

**दीर्घकथा**

युद्धविराम आणि होरपळ

**नाटक**

थँक यू मिस्टर ग्लाड
कोलंबस वाट चुकला
हमिदाबाईची कोठी
पुत्रकामेष्टी
आकाश पेलताना
जुलिएटचे डोळे ( अप्रकाशित )
चर्मणवती चंबळ

**इतर**

रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता
डु दाओ अन् चर्च बेल्स



# मी स्वामी या देहाचा

अनिल बर्वे

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

मी स्वामी या देहाचा
पॉप्युलर प्रकाशन
(म – ५२८)

Mi Swamy ya Dehacha
( Marathi Play )
Anil Barve

© प्रेरणा बर्वे

पहिली आवृत्ती १९८६/१९०८

या नाटकाच्या प्रयोगाचे सर्व हक्क श्रीमती प्रेरणा बर्वे यांच्याकडे आहेत. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी त्यांची लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे. पत्रव्यवहाराचा पत्ता : ६, एकवीरा अपार्टमेंट, वीर सावरकर मार्ग, मुंबई ४०० ०२८.

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

मुद्रक
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१, शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

‘ मी स्वामी या देहाचा ’ या नाटकाचा प्रथम प्रयोग नाट्यसंपदा, मुंबई यांनी २७ ऑक्टोबर १९८२ रोजी रवींद्र नाट्यमंदिर, मुंबई येथे ‘ मी मालक या देहाचा ’ या नावाने दुपारी ४–३० वाजता सादर केला.

| | | |
|---|---|---|
| **रूपांतर संकल्पना** | : | प्रवीण सोलंकी |
| **दिग्दर्शक** | : | कांती मडिया |
| **नेपथ्य** | : | छेल-परेश |
| | | सहाय्यक : राजाराम चव्हाण |
| **पार्श्वसंगीत** | : | पुरुषोत्तम उपाध्याय |
| **ध्वनिसंकेत** | : | दीपक पालेकर |
| **प्रकाशयोजना** | : | शरद भूपेन, केतन मोदी, रवींद्र देसाई, किरण बोकरी |
| | | सहाय्यक : राजाराम शिंदे, विजय मोरे |
| **रंगभूषा** | : | वर्दम मेकअप सर्व्हिस |
| **वेशभूषा** | : | जगन ननावरे, नारायण हेंबाडे |
| **रंगमंच-व्यवस्था** | : | रंगसेवा, मुंबई |
| **निर्मिती सहाय्य** | : | श्रीकांत रानडे, प्रभाकर नरवणकर |
| **निर्मितीप्रमुख** | : | विजया पणशीकर, अशोक समेळ |
| **निर्माता** | : | प्रभाकर पणशीकर |

‘ **मी मालक या देहाचा** ’ या नाटकात काम केलेल्या कलाकारांची नामावली

| | | |
|---|---|---|
| विक्रम गोखले | फैयाज | भाग्यश्री देशपांडे |
| चारुलता राजेशिर्के | अलका कुबल | अशोक समेळ |
| विसू कामेरकर | रमेश गोंधळेकर | इर्शाद हश्मी |
| दीपक वैजापूरकर | श्रीकांत रानडे | श्रीकांत मोघे |

# प्रस्तावना

आज अनिलच्या माघारी अनिलचं हे नवीन नाटक प्रकाशित होत आहे.

एरवी अनिलचं नाट्यलिखाण म्हणजे दोन-तीन वर्षांचा कालावधी ठरलेला. कल्पना सुचली की, त्याला आधी नाटकाचं नाव, सुरवात आणि शेवट सुचायचा. आणि मग मधल्या मजकुराचा लांबलचक प्रवास सुरू व्हायचा. एकेक सीन तासन्‌तास डोक्यात घोळवत बसायचा. मात्र—जेव्हा केव्हा लिहायचा—तेव्हा त्यात नंतर बदल, काटछाट नसायची.

पण हे नाटक वेगळं. चार-सहा महिन्यांत लिहून झालं. अनिल तेव्हा के. ई. एम्. हॉस्पिटलच्या डॉक्टर मित्रांच्या कंपूत असायचा. मर्सी किलींग— दया मरणाच्या विचाराने तेव्हा त्याला झपाटलेलं होतं, आणि कांती मडिया नेमके त्याच विषयावरचे " Who's Life is it Anyway " हे नाटक घेऊन अनिलकडे आले. त्यांना हे मराठीतून हवं होतं. इंग्रजीच्या बाबतीत अनिलकडे म्हणजे सगळा आनंदीआनंदच होता. त्यामुळे कांतीभाईंनी त्याला विषय समजावून सांगितला. पण अनिल त्या नाटकातील विचारांच्या संपूर्ण विरोधात होता. 'व्यक्ती ही व्यक्तीसाठी नसते, ती समाजासाठी असते ' हे मानणाऱ्या त्याच्या भारतीय मनोवृत्तीला ती पाश्चात्य व्यक्तिवादी भूमिका पटणारी नव्हती. त्यातील निराशावादी विचार त्याच्या प्रकृतीला रुचणारे नव्हते. परिणामी एक वेगळीच कलाकृती जन्माला आली, " शपथपूर्वक खोटं सांगतो की—"

नाट्यसंपदेतर्फे हे नाटक खूप बदल करून ' मी मालक या देहाचा ' या नावाने रंगभूमीवर आणलं गेलं. त्यातील बदल अनिलला कधीच मान्य झाले नव्हते. आत्ताचे प्रकाशित नाटक हे अनिलनं लिहिलेलं मूळ नाटक आहे. फक्त यातील अंक पहिला, प्रवेश पाचवा हा नाट्यसंपदेने बदल केलेला प्रवेश आहे. अनिलच्या मूळ लिखाणात एवढी इंग्रजी वाक्ये नव्हती. कारण मुळात ती त्याला येत नव्हती. तसंच त्यात विकी खरंच मारायला आला आहे असं समजून मृत्यू

समोर आल्यावर मात्र अभिजित घाबरून "मला मारू नकोस" असं ओरडतो, असं आहे. दुर्दैवाने सदर एक पान मला कुठंही मिळालं नाही. त्यामुळे जो मिळाला तो प्रवेश दिला आहे.

नाटकाचे गुणावगुण रसिक ठरवतीलच, पण त्यांच्यासमोर हे नाटक आणण्याचे श्रेय आहे 'पॉप्युलर प्रकाशन'चे श्री. रामदास भटकळ यांना! अनिलचं साहित्य सध्या जरा विस्मृतीत झाकोळलेलं आहे. अश्यांची दखल घेणं, तेही त्या नाटकाचे प्रयोग चालू नसताना, हे शहाणपणाचे लक्षण नव्हे. श्री रामदास भटकळ यांनी दाखविलेल्या या 'वेडेपणा'बद्दल मी त्यांची कृतज्ञ आहे.

शेवटी, हे नाटक ज्याच्या शब्दा-शब्दांमधून राहाणाऱ्या अनिला तुलाच हे अर्पण.

४–९–८६ प्रेरणा बर्वे

म. ग्रं. सं. [illegible]
वा. क्र....29883 ... 281876
दि. ...

अंक पहिला प्रवेश पहिला

" मी प्राणरक्षक देवता आश्विनीकुमारांना साक्ष ठेवून....माझ्या पूर्वसूरींच्या गुरुजनांना...वैद्य जीवक, वैद्य सुश्रुत...वैद्य चरक...आदींना स्मरून शपथ घेतो की...

माझ्या सर्व शक्तीनिशी...माझे ज्ञान, कौशल्य आणि निदान पणाला लावून... माणसाच्या जिवाचे रक्षण करीन....रोग, व्याधी नि दुःखापासून माणसाला मुक्त करण्याचा मी प्रयत्न करीन...वैयक्तिक रागलोभापोटी...कोणा माणसाला...रुग्णाला, माझ्या ज्ञानाने मी इजा पोहोचवणार नाही. तसेच....कोणालाही माझ्या ज्ञानापासून मी वंचित करणार नाही...

कोणाही रुग्णाने, यातना आणि वेदनांना घाबरून...विषप्राशनाची इच्छा व्यक्त केली...तरी मी त्याला विष देणार नाही....तसेच कोणत्याही कारणास्तव कोणत्याही माणसावर विषप्रयोग करण्याचा सल्ला मी देणार नाही....तसेच कोणत्याही प्रकारे विषप्रयोगात मी सहभागी होणार नाही (क्षणभर शांतता)

ईश्वराचा अंश असलेला प्रत्येक मानव देह, जगवणे, वाचवणे . हाच माझा धर्म आहे....नि याच धर्माचे मी पालन करीन...

हे अश्विनीकुमारांनो, हे पूर्वसूरींच्या माझ्या वैद्यगुरुजनांनो... जोपर्यंत मी माझ्या धर्माचे पूर्ण निष्ठेने, नि प्रामाणिकपणे पालन करीन... तोपर्यंत तुमच्या आशिर्वादाने मला तुमचीच प्रतिष्ठा, आत्मशांती नि समाधान लाभो....जर, मी माझ्या धर्माशी द्रोह केला...तर तुमच्या क्रोधाला, मी बळी पडो ! "

(कोरसमधील शपथ संपते ..पूर्ण अंधार नि श्रेयनामावलीची सुरवात...)

## अंक पहिला

## प्रवेश दुसरा

(प्रकाश पडतो. सिटी हॉस्पिटलमधील श्रीमंत पेशंटसाठी असणारी रूम दिसू लागते. खाटेवर अभिजित पडलाय...सलाईन लावलेले.... शेजारी सिलेंडर ठेवलाय.. प्रौढ सिस्टर पुस्तक वाचत बसली आहे.. अभिजित कण्हतो....नि सिस्टर आनंदाने उठत...इंटरकॉमवरून बोलू लागते.)

**सिस्टर :** डॉक्टर विकी कपूर प्लीज....डॉक्टर, पेशंट शुद्धीवर आलाय...येतोय.... (ती इंटरकॉम ठेवून भराभर पलंगाचे हॅण्डल फिरवते....नि पलंगाची बाजू उचलली जाते...संपूर्ण हातापायांना प्लॅस्टर असलेला अभिजित पुतळ्यासारखा पलंगावर बसला आहे...शून्य नजरेने एकटक पाहतोय...विकी कपूर येतो. पाठोपाठ ॲडव्होकेट राजगुरू.)

**विकी :** कसा आहेस मित्रा?....(अजून अभिजित शून्य नजरेत. विकी त्याच्यासमोर हाताची बोटे दाखवत प्रश्न विचारतो.)....ही किती बोटं आहेत?

**अभिजित :** (यांत्रिकपणे) दोन.

**विकी :** अन् ही?

**अभिजित :** चार...विकी, तू मला बे चे पाढे शिकवतोस की काय? (अभिजितची नजर आता जिवंत झाली आहे.)

**विकी :** (आनंदून) तू मला ओळखलंस अभिजित?

**अभिजित :** न ओळखायला काय झालं? सारा जन्म खडकात चेहेरे खोदण्यात गेला....माणसांचे चेहरे कसे विसरीन?...बाय द वे विकी, मी अमेरिकेत आहे...का तू इंडियात आहेस?

**विकी :** मी इंडियात आहे ..आणि तू सिटी हॉस्पिटल...अकरावा मजला...

**राजगुरु :** कसायस अभिजित?

**आभिजित :** ते आता विकीनं ठरवायचं...तुझं कसं काय चाललंय?

**राजगुरु :** छान!...देशातली कायदा नि सुव्यवस्था दिवसेंदिवस ढासुळत आहे.... अन् आम्हा तमाम वकिलांची बरकत वाढत आहे....

**विकी :** अभिजित....कसं वाटतंय तुला?

**अभिजित :** डोळे उघडले नि जागा झालो तेव्हा क्षणभर वाटलं, आपण कबरीतनं उठून बसलोय...खूप दिवस, वर्षे, महिने झोपून होतो...योगनिद्रेत होतो असं वाटलं....समाधी अवस्था....तारीख किती आज?

**विकी :** सहा जून.

**अभिजित :** म्हणजे...मी...सहा महिने?

**विकी :** कोमामधे होतास.

**अभिजित :** कोमामधे...सहा महिने मी नुसता प्रेतासारखा झोपून होतो...?

**राजगुरु :** हो... आणि या विकीची झोप उडाली होती... तुला...जगवायला... वाचवायला हा रात्रीचा दिवस करीत होता.

**अभिजित :** विकी तुझं हे ऋण छिन्नीच्या चार ठोक्यांत मी फेडून टाकीन... आदि-शक्तीचं शिल्प पूर्ण केल्यावर... त्याच्या पायथ्याशी मी कोरून टाकीन... "हे शिल्प, डॉक्टर विकी कपूर यांच्या अहोरात्र परिश्रमाने पूर्ण झाले..."

**राजगुरु :** काही जरुरी नाही... अभी, तू विकीच्या ऋणातून केव्हाच मुक्त झाला आहेस ?

**अभिजित :** तो कसा ?

**राजगुरु :** ...अरे अभी... जेवढा बदनाम अशील तेवढा नामवंत वकील!... त्याचप्रमाणे, जेवढा मोठा पेशंट... तेवढा मोठा डॉक्टर... लेका, तू दोनशे फूट उंचावरून पडलास. तुला तुझ्या वडाऱ्यांनी... पाथरवटांनी या हॉस्पिटल-मध्ये आणलं.... तेव्हा तू जगण्याची आशाच सगळ्यांनी सोडली होती ! तू चार पाच तासांत निश्चित मरणार.... म्हणून पेपरवाल्यांनी मृत्युलेख नि तुझ्या फोटोंचे ब्लॉकही तयार करून ठेवले होते.... बिचाऱ्यांची मेहनत वाया गेली. विकीनं तुला वाचवलं... मग कोडगेपणाने त्यांनी विकीवरच लेख लिहिले... 'विसाव्या शतकातील धन्वंतरी... डॉक्टर विकी कपूर !'...

**अभिजित :** विकी... थँक्यू... थँक्यू व्हेरी मच !

**विकी :** थँक्यू कशासाठी ?... माणसांना जगवणं, वाचवणं हेच माझं काम आहे. हाच माझा धर्म आहे !

**अभिजित :** विकी मला वाचवल्याबद्दल नाही... आदिशक्तीचं शिल्प पूर्ण करण्या-साठी मला नवं जीवन दिलंस म्हणून तुझा आभारी आहे.

**विकी :** ( हसून ) अभी, जीवन मी नाही.... त्यानं तुला दिलं... नवजीवन मी नाही... तुझ्या इच्छाशक्तीनं तुला मिळालं... मी फक्त प्रयत्न केला.

**राजगुरु :** विकी, साल्या, एक नंबरचा हिपोक्रॅट आहेस.... परमेश्वर कोण रे ? इच्छाशक्ती कसली बोडक्याची ?.... साला, हा दोनशे फुटांवरून कोसळला तेव्हा काय, आपण जगूच अशी याची खात्री होती... काय अभी, तू पडलास तेव्हा तुला काय वाटलं ?

**अभिजित :** खरं सांगू राजगुरु...मी पडलो, तेव्हा मरणाची भीतीच मला वाटली नाही...मला फक्त चुटपूट लागली...हे भव्य शिल्प पूर्ण व्हायला हवं आणि राजगुरु, यू विल नॉट बिलीव्ह...पण जेव्हा दोनशे फुटांवरून मी कोसळलो... नि खालच्या वडाच्या झाडानं मला झेललं...तेव्हा वाटलं पारंब्यांच्या रूपानं सहस्रभुजांनी माझी आदिशक्तीच मला झेलतेय...

**विकी :** अभी तू कसा पडलास ? का पडलास ? तुला आठवतंय ?

**अभिजित :** हो ! पक्कं आठवतंय. गेल्या बारा वर्षांत आदिशक्तीचं शिल्प खोदत पायापासून दोनशे फूट उंचीपर्यंत गेलो मी !...पण खांद्यापर्यंत कोरून झाल्या-वर . या आदिशक्तीचा चेहरा कसा असेल याचा मी नुसता विचारच करत राहिलो . विचार करता करता केव्हा तोल गेला कळलंच नाही !

**राजगुरु :** अभी, तुझा तोल...आदिशक्तीचं शिल्प खोदावयास गेलास, तेव्हाच गेला होता ! च्यायला पुढाऱ्यांचे पुतळे पाडून हजारो रुपये कमवत असताना... हे दिडकीची कमाई नसलेलं शिल्प खोदण्यास तू सुरवात केलीस...तेव्हाच तुझा तोल गेला. तू पडलास फक्त आता...बारा वर्षांनी ! काय विकी ?

**विकी :** ( राजगुरूकडे दुर्लक्ष करीत ) अभी...तुला निदान पडताना तरी, आदि-शक्तीचा चेहरा दिसला...

**अभिजित :** थोडासा...अस्पष्ट...धूसर...एखाद्या स्त्रीसारखा. आईसारखा... बहिणीसारखा...मुलीसारखा....प्रेयसीसारखा...एखाद्या नागिणीसारखा.... वाघिणीसारखा...( सांगता सांगता उठायचा नि हात उचलायचा प्रयत्न करतो...उचलत नाहीत. ) विकी, माझे हातपाय का रे असे दगडासारखे जड झालेत ?

**विकी :** ( भांबावून ) काही–काही नाही...तू इतके दिवस कोमामधे होतास ना ? ब्रेनसेल्सचं फंक्शनिंग थांबलंय....होतील....तुझे पाय सहा महिन्यांत पूर्ववत् होतील.

**अभिजित :** चार सहा महिने ?...बाप रे ! काय रे विकी....तू ब्रेन फंक्शनिंग म्हणालास....माझा मेंदू.. माझी प्रतिभा पक्की शाबूत आहे ना ?

**विकी :** इतकं चुरचुरीत बोलतोयस....तरी शंका वाटते ?...तुझ्या ब्रेनचे फोटो घेतलेत मी. तुझी बुद्धी पक्की शाबूत आहे.

**अभिजित :** आणि हातपाय ?

**विकी :** सहा महिन्यांत खडखडीत होतील....मोठे मोठे खडक कातळ फोडतील...

**अभिजित :** मग हरकत नाही...सहा महिनेच काय, वर्षभर या तुरुंगात, हॉस्पिटल-मधे राहीन....हां...वेळ काढायला कठीण जाईल.

**विकी :** बिलकूल नाही.. ही सिस्टर, तुला गाणी ऐकवेल, टी. व्ही. पहा, कंटाळा आला तर, हिच्याकडून पुस्तकं, कादंबऱ्या वाचून पहा...

**अभिजित :** पण विकी...मी नक्की बरा होईन ना ? विकी, आदिशक्तीचं शिल्प पूर्ण करायचं, एवढीच माझी आयुष्यातली एकमेव महत्त्वाकांक्षा...तेवढंच जगण्याचं कारण आहे. तेवढ्यासाठी जगतोय...हात-पाय, नाही तर मेंदू...कशावरही वाईट परिणाम झाला तर मी ते शिल्प पूर्ण करू शकणार नाही......मग मी जगलो तरी त्याला काही अर्थ नाही.

**विकी :** खुळा...तू शिल्प पूर्ण करणार आहेस. आणि स्वतःच्या हातांनी त्याच्या पायाशी माझं नाव कोरणार आहेस...

**अभिजित** खरं विकी.. अगदी खरं ?

**विकी :** अभी, मी खोटं कधीच बोलत नाही. सिस्टर, याला घेऊन चला !

**अभिजित :** कुठं ?

**विकी :** संपूर्ण चेकअपसाठी.......तुझ्या एका हातात छिन्नी......नि एका हातात हातोडा द्यायचाय ना मला ?

( सिस्टर, वॉर्डबॉय....अभिजितची खाट ढकलत बाहेर नेतात. )

**राजगुरु :** विकी, खरंच तू धन्वंतरी आहेस ! अभीला तू खडखडीत बरा करतोयस ?

**विकी :** ( निःश्वास टाकत ) नाही राजगुरु...तो आता पुन्हा कधीच खडखडीत बरा होणार नाही. त्याच्या हातापायांचा....शरीराचा दगड झालाय दगड... तो आता जिवंत आहे....फक्त मरणाची वाट पाहण्यासाठी !

**राजगुरु :** काय ? पुन्हा अभी हातात छिन्नी-हातोडा घेऊ शकणार नाही...दगड... कातळ खोदून शिल्प पुरे करू शकणार नाही ?

**विकी :** सॉरी राजगुरु....पण आता तो शिल्प पुरं करू शकणार नाही.

**राजगुरु :** मग कशाला जगवतोयस त्याला.... त्याला सुखानं मरू दे तरी !

**विकी :** मी त्याला जगवतोय....कारण, मी दिवास्वप्न पहातोय ..तो शिल्प खोदतोय याचं...मी त्याला जगवतोय...कारण....मला खोटी आशा आहे....तो बरा होईल याची...आणि त्यासाठी राजगुरु...मी खराखुरा प्रयत्न करतोय... मनापासून...सर्व शक्तीनिशी.... !

( हळूहळू अंधार. छिन्नी आणि सुरुंगाचे आवाज. )

## अंक पहिला — प्रवेश तिसरा

( सकाळची वेळ....सिस्टर खुर्चीत बसवलेल्या अभिजितला स्पंजिंग करीत आहे. रोजच्या राउंडला विकी येतो.)

**सिस्टर :** गुड मॉर्निंग डॉक्टर !

**विकी :** गुड मॉर्निंग...हॅलो, अभिजित कसा आहेस ?

**अभिजित :** हे तूच मला सांगायचं आहेस. मी कसा आहे ?

**विकी :** छान आहेस. हळू हळू सुधारणाय

**अभिजित :** ( प्रत्येक शब्दावर जोर देत ) विकी, तू म्हणाला होतास की मी कधी खोटं बोलत नाही !

**विकी :** हो...मी कधीच खोटं बोलत नाही...

**अभिजित :** पण तू खरं का नाही बोलत ?

**विकी :** ( चमकून ) काय...काय खरं बोलायचं ?

**अभिजित :** तू मला एकदाच का सांगून टाकत नाहीस... मला कॉड्रीप्लेजिया झाला...माझ्या शरीराचा संपूर्ण दगड झालाय...

**विकी :** तुला कोणी सांगितलं ?

**अभिजित :** या पुस्तकांनी !

**विकी :** (टेबलावरची पुस्तके पाहातो.) प्रिन्सिपल्स ऑफ फिजिऑलॉजी...आप्लाइड बायोकेमिस्ट्री... ( रागवत ) सिस्टर, मी तुला कविता, नाटकं वाचून दाखवायला सांगितलं होतं... मेडिकलची पुस्तकं नाही.

**अभिजित :** तिच्यावर कशाला डाफरतोस ? मीच तिला वाचून दाखवायला सांगितलं...

**विकी :** अभी, दोनचार महिन्यांत पुस्तकं वाचून मेडिकल सायन्स कळत असतं— तर बारा वर्षं मी झक नसती मारली...

**अभिजित :** मी कुठं म्हणतोय मला मेडिकल सायन्स कळलंय... मी फक्त एवढंच म्हणतोय... मला माझा रोग कळलाय. ज्याच्यावर कुठलाही उपाय नाही...

**विकी :** उपाय आहे. फक्त अजून तो आपल्याला माहीत नाही....

**अभिजित :** केव्हा माहीत होईल ? आज, उद्या का शंभर वर्षांनी ?

**विकी :** भविष्य सांगायला मी कुडमुड्या ज्योतिषी नाही.

**अभिजित :** ( शांतपणे ) ठीकय....मग एक काम कर...मला मॉर्फियाचं इंजेक्शन दे...नाहीतर झोपेच्या गोळ्या. मला मरू दे...

**विकी :** आय ॲम ए डॉक्टर.. ॲण्ड नॉट ए किलर...मी डॉक्टर आहे. खुनी नाही. मला खडी फोडायला नाही जायचंय !

**अभिजित** . माझा खून नको करू. फक्त माझ्यावरचे औषधोपचार बंद कर....चार आठ दिवसांत मी आपोआप मरीन.

**विकी :** तू मरशील हे माहीत असताना तुझ्यावरचे औषधोपचार बंद करणं.... माझ्या नीतीत बसत नाही.

**अभिजित** · ( संतापत ) कसल्या नीतीच्या गप्पा मारतोस ? खालच्या मजल्यावर तर गर्भपाताचं सेंटर उघडलंयस...रोज छप्पन्न बाया पासष्ट रुपयांत निर्धोकपणे गर्भपात करून जातात...

**विकी** ( शांत स्वरात ) हो...मी गर्भपात करतो म्हणजे भ्रूणहत्या नाही करत... एकक दिवसाची बेवारशी टाकून दिलेली पोरं इथं आम्ही सांभाळतो...गर्भपात करतो, कारण ज्या मुलाला चांगलं सुखी जीवन देण्याची आईबापांची ताकद नाही...त्या मुलांना त्यांनी जन्म देणंच चुकीचं आहे...त्याचप्रमाणे ज्याला जीवन देता येत नाही, त्याला मारणं पाप आहे...

**अभिजित :** ( अगतिकपणे ) पण ह्या वेदना मला आता सहन नाही होत...

**विकी** : होतायत्. वेदना ह्या सुसह्यच असतात. वेदना असह्य झाल्या की माणूस बेशुद्ध पडतो...बेशुद्धी म्हणजे माणसाला निसर्गानं दिलेलं कवच कुंडल....

**अभिजित** : पण हे असलं...अगतिक लाचार जीवन...स्वतःच्या हातांनी साधं तोंड पुसता येत नाही...लघवीसाठी भांडं घ्यायच...संडासासाठी बेडपॅन....

**विकी** : लहानपणी, कुकुलं बाळ होतास...तेव्हा काय ढुंगण स्वतःच्या हातांनी धुवायचास? आता ताई आहे....हिला आम्ही सिस्टरच म्हणतो.

**अभिजित** : म्हणजे...मी असंच जगत राहायचं...झाडाझुडपासारखं! (श्वास घेतो.)

**विकी** : हातपाय म्हणजे काही आयुष्य नाही...तुझ्या हातापायापेक्षा यंत्र जास्त काम करतात.

**अभिजित** : पण यंत्र शिल्प नाही खोदू शकत ना? आदिशक्तीचं शिल्प पूर्ण करणं एवढंच आयुष्यातलं एक कार्य होतं... जे मी आता कधीच पूर्ण करू शकणार नाही.

**विकी** : तू काय स्वतःला ईश्वराचा अवतार समजतोस? अवतारकार्य संपलं, आता निघावं वैकुंठाला...

**अभिजित** : ईश्वर वगैरे काही नाही...मी...मी फक्त स्वतःला एक निरुपयोगी... खायला काहार नि भुईला भार झालेला समजतोय...

**विकी** : उपयोगी–निरुपयोगी ठरवायचं कोणी? तुझी छिन्नी हातोडा माझ्यासाठी निरुपयोगी... मोटारींचा शोध लागला, आता घोड्यांचा उपयोग नाही माणसाला... मग काय जगातली सगळी घोडी मारून टाकायची?... या तर्कानं म्हातारे कोतारे, लुळे पांगळे...

**अभिजित** : बस कर... माझं आता काय करणार आहेस, एवढंच सांग.

**विकी** : मी तुला जिवंत ठेवणार...तुला पुन्हा बरं करण्याचा प्रयत्न करणार...

**अभिजित** : त्या प्रयत्नात यश मिळणार नाही हे तुला पक्कं ठाऊक आहे ..

**विकी** : यश हे व्यक्तीला नाही मिळत...माणसाला मिळतं... आणि माणसाला यश मिळावं म्हणून मी माझे व्यक्तिगत प्रयत्न चालू ठेवणार...तुझं शरीर... म्हणजे माझ्यासाठी एक प्रयोगशाळा आहे...मी त्याच्यावर प्रयोग करीन.... अभ्यास करीन. आज ना उद्या....मला नाही तर दुसऱ्या कोणाला... या रोगावर उपाय सापडेल....

**अभिजित** : म्हणजे माझ्यावर तू प्रयोग करणार– तुझ्या ज्ञानासाठी! ॲनॅटॉमी डिपार्टमेंटमधे उंदरामांजरावर करता तसे माझ्यावर प्रयोग करणार? ..आणि तेही माझ्या सम्मतीशिवाय?

**विकी** : दगडांमधे तू शिल्पं खोदलीस, तेव्हा विचारलंस त्या दगडांना? सम्मती घेतली होतीस त्यांची?... काय बनवू दगडा तुझं? घोडा की गाढव?

**अभिजित :** ( चिडून ) अरे, ते दगड निर्जीव होते निर्जीव !... आणि मी एक जिवंत माणूस आहे. हातपाय गेल्यानं ज्याला जगायला काही कारणच नाही उरलं...

**विकी :** जगायला काही कारण पाहिजेच असा अट्टाहास कशासाठी ? मरायचं नाही– जगायचं...हो.... एवढं एकच कारण जगायला पुरे आहे....

**अभिजित :** विकी....वादविवादात तू कोणाला हार जाणार नाहीस. कॉलेजमधे ' मर्सी किलिंग करावं की न करावं ' या वादस्पर्धेत, मर्सी किलिंग करावं म्हणून वाद घालून तू स्पर्धा जिंकली होतीस...आता मात्र...आता मात्र तुझं पापभीरू मन मर्सी किलिंगला तयार नाहीय. पण तुला पुराणातला एक दाखला देऊ ?

**विकी :** काय ?

**अभिजित :** अरे, एवढा मोठा तपस्वी परशुराम ऋषी . त्याची आई रेणुका....ती पाचपन्नास महारोग्यांची सेवा करीत होती...जी परशुरामाला पाहवली नाही... त्यानं सरळ जाऊन त्या महारोग्यांची परशू घेऊन कत्तल केली.. रेणुकेला जेव्हा कळलं तेव्हा ती म्हणाली, ' परशुराम, हे काय केलंस ? '...तेव्हा परशुराम उत्तरला.. ' माते, तुझ्यापेक्षा त्यांची मी जास्त सेवा केली. ज्यांना सुखाचं जीवन जगता येत नव्हतं...त्यांना सुखाचं मरण मी दिलं.'

**विकी :** मूर्ख....मूर्ख होता तो परशुराम...अरे, डेट्रॉप्सच्या चार गोळ्यांनी आता महारोगी बरा होतो...नि रुपड्याला दहा गोळ्या मिळतात...स्ट्रेप्टॉप्सनच्या....

**अभिजित :** ( चिडून ) तेव्हा त्या गोळ्या माहीत नव्हत्या...

**विकी :** मग त्यानं शोधायच्या होत्या....आणि जर औषध शोधायची बुद्धी त्याच्यात नव्हती तर, रोगी मारायची शक्ती त्यानं वापरायला नको होती... (एकदम स्वतःला सावरत)...काय मूर्खासारखा वाद घालतोय मी... अभी, तू ही अर्धवट ज्ञान देणारी मेडिकलची पुस्तकं वाचलीसच ना... म्हणूनच इरिटेट झालो मी. तुझी केस मी मेडिकल जर्नलमध्ये छापायला पाठवलीय.... सर्व भाषांत ! नि जगातल्या सर्व डॉक्टरांना आवाहन केलंय... या रोगावर उपाय शोधा... बस्... एक दोन महिन्यांत मला न सुचलेले उपाय, जगभरचे डॉक्टर्स मला सुचवतील. मग चार सहा महिन्यांत तू खडखडीत बरा होशील .. (खोटे हसत)... हे सांगायचं राहिलं बाजूलाच... मी वादासाठी वाद घालीत राहिलो.

**अभिजित :** विकी, तू वादासाठी नाही... मनापासून वाद घातलास... कारण, तुला माहितीय या रोगावर उपाय नाही . मी मरणार आहे...

**विकी :** अरे मूर्खा...आता कोणाची शपथ घेऊन सांगू ? तू ठणठणीत बरा होणार आहेस...बस...हा रोगच दुर्मिळ...म्हणून उपाय शोधायला थोडा वेळ लागेल...पण उपाय आहे...आपण तो करणारही आहोत...आणि अभी,

जर खरंच काही उपाय नसेल, तर निरुपाय म्हणून मी तुला सुखानं मरू देईन.... असं तडफडत ठेवणार नाही...शपथपूर्वक खरं सांगतो...सिस्टर...याच्यापुढे याला नाटकं, कादंबऱ्या वाचून दाखवायच्या....ही असली पुस्तकं नाही... समजलं ? ( ताड्ताड् निघून जातो. )

**अभिजित :** ( हताशपणे )...शी....हा विकी म्हणजे निव्वळ रोबो आहे रोबो.... यंत्रमानव.. यांत्रिकीपणे विचार करायचा...यांत्रिकीपणे जगायचं...साला, जेवताना देखील अन्नाची चव लागत नाही...व्हिटॅमिनस् आणि फॅटस् चिवडतो...सिस्टर, तुला काय वाटतं ? माणूस कारणाशिवाय जगू शकतो ?

**सिस्टर :** नाही तर...प्रत्येकाला जगायला काही तरी कारण हवंच.

**अभिजित :** तुलाही.. तुलाही जगायला कारण आहे ना ?...

**सिस्टर :** आहे तर—

**अभिजित :** काय आहे ?

**सिस्टर :** ( हसते ) मोठ्या माणसांना जगायला मोठी कारणं लागतात...छोट्या माणसांना जगायला छोटी कारणं पुरतात...मला एक गोड मुलगी आहे.... तेवढं कारण मला जगायला पुरतं...

**अभिजित :** ( मोठ्याने हसतो ) माय गॉड....तुला मुलगी आहे ? मी तर तुला अन्—मॅरिडच समजलो.

**सिस्टर :** ( थंडपणे )....मी....अन्मॅरिड नाही. विडो आहे...

**अभिजित :** ( चेहरा पडतो )...ओऽहंऽऽसॉरी...किती वर्षं झाली ?

**सिस्टर :** पंधरा—

**अभिजित :** ( आश्चर्याने ) पंधरा ?....पंधरा वर्षं तू विधवेचं आयुष्य जगतेस... तुला कधी पुन्हा लग्न करावं, संसार मांडावा असं वाटलं नाही ?

**सिस्टर :** वाटून काय उपयोग ?...एक आईदेखील सावत्र मुलावर सख्ख्या मुलासारखं प्रेम करू शकत नाही....मग सावत्र बाप कसा करेल ?

**अभिजित :** पण तुझी मुलगी मोठी होईल...लग्न करील. सासरी निघून जाईल.... आणि मग एकाकी एकटं वैधव्याचं आयुष्य काढावं लागेल...

**सिस्टर :** वैधव्य ईश्वरानं माझ्या कपाळी लिहिलंय....पण माझ्या मुलीला तर मी जन्म दिला ना ?

**अभिजित :** सिंपली... ग्रेट... ग्रेट... तू, विकी असं काही बोलायला लागलात ना... की वाटतं खऱ्या अर्थानं तुम्ही ग्रेट आहात... मी भरपूर प्रसिद्ध... पण छोटा, क्षुद्र माणूस.... स्वतःच्या कलेच्या कैफात असणारा, माणसांच्या आयुष्याचा मी कधी इतका विचार केला नाही....

**सिस्टर :** म्हणून काय झालं ?... तुम्ही दगडांना रूप दिलंत, घडवलंत... जो दगडावरही एवढी माया, प्रेम करू शकतो... तो क्षुद्र....छोटा कसा ?

**अभिजित :** हूं .. दगड !... स्वतःच दगड होऊन बसलोय ! सिस्टर, प्लीज जरा खाली सरकवणार ?
( सिस्टर त्याला खुर्चीतच खाली सरकवते. त्याचा दगड झालेला पाय उचलून स्टुलावर ठेवते. )
थँक्स...

**सिस्टर :** कादंबरी वाचून दाखवू ?

**अभिजित :** रेडिओ, कॅसेट्स्, टी. व्ही., पुस्तकं... कशा कशात मन रमत नाही.... पण वाच... मला नाही तरी तुला समाधान... माझ्यासाठी काहीतरी प्रयत्न केल्याचं...
( सिस्टर स्टूल पुढे ओढते. त्यावर बसत पुस्तक उघडते. आणि पुस्तकातून पाच-सहा फोटो खाली पडतात. )

**अभिजित :** फोटो कोणाचे ?

**सिस्टर :** माझ्या मुलीचे... रोझीचे ... ( फोटो दाखवते. )

**अभिजित :** ओह...सुंदर ....स्वीट सिक्टीन... डिव्हाईन ब्यूटी....

**सिस्टर :** म्हणजे काय ?

**अभिजित :** डिव्हाईन ब्यूटी.. दैवी सौंदर्य... म्हणजे असं सौंदर्य की, ज्याच्याकडे पाहाताना फक्त सौंदर्याचाच आनंद मिळतो... सुंदरतेचा साक्षात्कार होतो... आसक्ती निर्माण होत नाही... वासना विकार चाळवत नाहीत.... तो बघू... ( सिस्टर दुसरा फोटो दाखवते )...हरिणाक्षी आहे.

**सिस्टर :** हरिणाक्षी ?

**अभिजित :** म्हणजे जिचे डोळे हरिणीसारखे भावुक, बोलके सुंदर डोळे....

**सिस्टर :** रोझीचे डोळे हरिणासारखे आहेत ?

**अभिजित :** ( हसून ) तुझी मुलगी असून तिचे डोळे हरणासारखे हे माहीत नाही ?

**सिस्टर :** मी तिचे डोळे कसे आहेत हे कधीच पाहिलं नाही.......फक्त डोळ्यांतच पाहात आले.

**अभिजित :** जेव्हा व्हीनस कोरली असेल, तेव्हा शिल्पकारापुढे अशीच कोणीतरी दैवी सौंदर्यवती बसली असेल...लिओनार्डो दा व्हिनसीनं मोनालिसा चितारली असेल तेव्हा त्याच्या समोरही अशीच कोणीतरी निरागस आणि पवित्र चेहऱ्याची सौंदर्यवती बसली असेल.......सिस्टर हिचा एखादा फुलसाईज फोटो आहे ?

**सिस्टर :** ( खिन्न मनाने ) नाही...कधी काढलाच नाही...

**अभिजित :** ( हसत ) का ?... कोणाची दृष्ट लागेल म्हणून ?...आण, तिला एकदा भेटायला....

**सिस्टर :** ( उत्साहाने ) आणीन....मुद्दाम आणीन....ती तुमची अगदी एकदम

फॅन आहे...तुमचं प्रत्येक एक्झिबिशन तिनं पाहिलंय्...तुमच्या प्रत्येक शिल्पाचे फोटो तिच्याकडे आहेत....तुम्हाला अपघात झाला, तर रात्रभर ती टिपं गाळीत बसली होती...तुम्ही शुद्धीवर येईपर्यंत ती रोज न चुकता माऊंट मेरीला तुमच्यासाठी प्रार्थना करायला जायची...(एकदम दरवाजाकडे पाहात) रोझी आली...

**अभिजित :** कशावरून ?

**सिस्टर :** ती आली की मला तिची चाहूल लागते. (आणि दरवाजावर टक्...... टक्...बाहेरून रोझीचा आवाज)

**रोझी :** ममा, मी येऊ ?

**सिस्टर :** हो...ये...(नि दरवाजा उघडतो. आत येताना रोझी धडपडते, नि पडते. पोलिओने जन्माची पांगळी झालेली, खाकेत कुबड्या......पायाला स्टीलच्या पट्ट्या...अभिजित सुन्नपणे तिच्याकडे पाहात राहतो.)

**अभिजित :** सिस्टर, फुलसाईझ फोटो न काढता, हिला कुणाची दृष्ट लागली ग ?

**सिस्टर :** (पाणावलेल्या डोळ्यांनी रोझीला उठवत) कोणाची लागणार ?...... माझीच लागणार ..रक्त आलं रोझी...थांब मी पट्टी बांधते.

**रोझी :** नको ग मम्मा...असं कधी खरचटून पायातनं रक्त यायला लागलं ना, की मला खूप बरं वाटतं...आनंद होतो...

**अभिजित :** बरं वाटतं ? आनंद होतो ?...

**रोझी :** हो अंकल. असं पायातनं थोडसं का होईना पण गरम गरम रक्त ओघळलं ना की मला कळतं, आपल्या पांगळ्या दुबळ्या पायांतही थोडा का होईना जीव आहे...थोडीशी का होईना पण धुगधुगी आहे ..मग मला माझ्या पायांची किळस नाही वाटत...शिसारी नाही येत...अंकल, तुम्ही कधी 'झू' ला गेलात ?

**अभिजित :** खूपदा.

**रोझी :** झू मधे काळविटं, हरणं असतात...टपोऱ्या डोळ्यांची...सुंदर, पण त्यांचे देखील पाय माझ्यासारखेच असतात....कुरूप काटक्यांसारखे...फक्त ते धावतात...मी पडते...आज माझा दिवसच पडण्याचा होता...आत्ता बसमधून उतरताना ड्रायव्हरने लगेच बस चालू केली....कशीबशी मी धडपडत उतरले...

**अभिजित :** कोण होता तो ड्रायव्हर ? नंबर सांग. आता त्याला धडा शिकवतो...

**रोझी :** नको अंकल. तो काही वाईट नसेल. कदाचित त्याने मला पाहिलीच नसेल. आमचा नेहमीचा ड्रायव्हर आहे ना, तो स्टॉप नसताना आमच्या चाळीपाशी माझ्यासाठी बस थांबवतो. कितीही गर्दी असली तरी कंडक्टर मला जागा करून देतो.

**सिस्टर :** पण इतक्या गर्दीची हॉस्पिटलमधे कशाला आलीस ?

**रोझी :** विसरलीस ? आज तुझा बर्थ डे ना ?....हॅपी बर्थ डे मम्मी... (गालाचा मुका घेते.) मला आज स्कूलमध्ये आठवलं. टीचरना सांगितलं मी, आज तुझा वाढदिवस आहे....टीचरनी विचारलं–कितवा ? ..मी म्हणाले, बाईला कधी वय विचारायचं असतं ? तर टीचर हसल्या नि त्यांनी मला एक कविता सांगितली...

एक खूप खूप सुंदर बाई होती....
दिवसें दिवस वाढता वाढता...जख्ख कुरूप....
म्हातारी झाली....
एक काळी कुरूप आई होती...
पण दिवसें दिवस वाढता वाढता...लख्ख
गोरीपान सुंदर झाली.
आईची बघता बघता, आजी देखील झाली !

(तिघेही हसतात.) किती–क्यूट आहे ना कविता ?....बरं मम्मा...आपण आज केक कोणता आणायचा ?

**सिस्टर :** रोझी, आज कुठलाही केक मला गोड नाही लागायचा...

**रोझी :** का ग ?

**सिस्टर :** खूप खटपट केली. पण तुझ्या ट्रिपपुरते पैसे नाही जमवता आले.

**रोझी :** कशाला वाईट वाटून घेतेस ममा ! अगं ताजमहाल पाहाणं माझ्या नशिबातच नव्हतं.

**सिस्टर :** कशावरून ?

**रोझी :** आज लीलाचे बाबा आले होते शाळेत....त्यांना कळलं, तेव्हा ते म्हणाले, रोझी, ताजमहाल पाहाच. खूप सुंदर आहे. मी तुझे पैसे भरतो.... आणि त्यांनी सातशे रुपये मास्तरांना दिले देखील... पण....

**सिस्टर :** पण काय ?

**रोझी :** (आवेगाने) मास्तर म्हणाले, या पांगळीला बरोबर घेतलं तर इतर मुलींच्या आनंदावर विरजण पडेल. त्यांना मनासाररखं हुंदडता बागडता येणार नाही.

**अभिजित :** कसला मास्तर आहे हा ?

**रोझी :** पोएट्रीचे मास्तर.

**अभिजित :** त्या गाढवाला सांग... काव्य कसलं शिकवतोस ? गणित शिकव गणित... अंश– छेद– गुणाकार– भागाकार– बेरीज– वजाबाकी इत्यादि...

**सिस्टर :** ( समजुतीने ) रोझी... या पगाराला मी तुला ताजमहालाचा रंगीत अल्बम आणून देखील देईन...

**अभिजित :** ( मध्येच ) नाही रोझी,... तू अल्बम नाही... ताजमहालच पाहाणार आहेस.... तुझ्या मैत्रिणी आग्र्याला पोचायच्या आधी तू तिथं पोहोचशील. उद्याच्या विमानानं तू आग्र्याला जा... माझा सेक्रेटरी तुझ्याबरोबर येईल. ...तो कारमधून तुला सर्व दाखवेल...फत्तेपूर शिक्री, हुमायूनची कबर.... ताजमहाल....

**रोझी :** कशाला.... मी मोठी झाले, मिळवती झाले की पाहीन मी ताजमहाल.

**अभिजित :** नाही रोझी...ताजमहाल पाहायचंही एक वय असतं, हेच वय असतं... ...यावेळी अजाणता जे जाणवतं, ते नंतर जाणीवपूर्वक देखील समजत नाही. आता...वास्तुशास्त्र, इतिहास समजत नसला तरी तुला ताजमहाल समजेल, भावेल. मोठेपणी तुला फक्त संगमरवरी दगड दिसेल.... आणि प्रश्न पडेल. ताजमहाल कोणाचा ?... हिंदूंचा की मुसलमानांचा ?

**सिस्टर :** ...पण एवढा खर्च ?

**अभिजित :** खर्च नाही सिस्टर...ही भेट आहे. नाताळची ..रोझीला दिलेली... सांताक्लॉजने !

**रोझी :** थँक्यू....थँक्यू व्हेरी मच अंकल !

**अभिजित :** सिस्टर, ऑपरेटरला सांगा......माझ्या सेक्रेटरीला मी बोलावलंय...

**रोझी :** अंकल...मी देखील तुमच्यासाठी एक भेट आणलीय....कोणती ती ओळखा पाहू ?

**अभिजित :** ( निराशपणे ) फुलांचा...ज्यांचा वास मला घेता येत नाही....नाही तर फळांची करंडी...जी मला चाखता येत नाहीत.

**रोझी :** अं हं वेगळीच. ममा म्हणाली, तुम्हाला एवढ्या रेकॉर्ड्स, कॅसेटस पैकी कसलंच म्युझिक आवडत नाही. त्यात तुमचं मन रमत नाही.......तेव्हा मी म्हणाले, कसं आवडेल ? प्रत्येकाला स्वतःचा ताल, स्वतःचा सूर असतो.... आणि तेच संगीत त्याला आवडतं...म्हणून जे ऐकून तुमचं मन रमेल असं इन्स्ट्रुमेंट आणलंय मी...( बोलता बोलता रोझी हातातील पिशवीतून एक छिन्नी आणि हातोडा काढते आणि छिन्नीवर हातोडा आपटायला लागते. स्टेजवर मंद प्रकाश नि छिन्नीचा खण् खण् आवाज. आवाजाबरोबर मधून मधून बूम...बू...म बू...म....असे सुरुंगाचे म्यूझिक वाढत जाते.)

**अभिजित :** ( ओरडत ) बस कर रोझी. ( म्यूझिक थांबते. ) ( स्वतःला सावरत, हसत ) छान...खरंच छान भेट आणली आहेस.

**रोझी :** आवडली ना....मग माझं आता एक काम करा.

**अभिजित :** काय ?

**रोझी :** माझ्या स्केचबुकवर तुम्ही आदिमायेचा चेहरा कसा खोदणार होतात तेवढा काढून द्या.

**अभिजित :** अगं, हात देखील उचलता येत नाही...स्केच कसं काढणार ?...आणि आदिमायेचं शिल्प तरी काय पुरं करणार ?

**रोझी :** आज नाही-उद्या—परवा...महिन्यानं...तुम्ही बरे झालात की, स्केच काढा.

**अभिजित :** मी कधीच बरा होणार नाही.........

**रोझी :** असं कसं म्हणता ? इतक्या उंचावरून खाली पडूनही तुम्ही वाचलात. याचा अर्थ आदिमायेचं शिल्प पूर्ण व्हावं अशी देवाची इच्छा आहे.

**अभिजित :** ( खंतावत ) देवाची इच्छा ! त्या विकीची जशी खोटी विज्ञाननिष्ठा आहे तशी तुझी खुळी अंधश्रद्धा, अगं, साऱ्या देहाचा दगड झालाय माझ्या.

**रोझी :** निर्जीव अचेतन दगडांमध्येही चैतन्यशील शिल्पं तुम्ही खोदली.......मग स्वतःच्या हाडामासाच्या शरीरात तुम्हाला तुमच्या इच्छाशक्तीनं पुन्हा चैतन्य का नाही निर्माण करता येणार ?

**अभिजित :** रोझी, नस्ता वाद घालू नकोस...छिन्नी-हातोडा, स्केचबुक सगळं परत घरी घेऊन जा....या वस्तू माझ्या डोळ्यांसमोर राहिल्या तर, छिन्नी आपण हातात घेऊ शकत नाही...दगड कोरणे राहू देच, पण साधं स्केचही आपण काढू शकत नाही......निव्वळ या कल्पनेनंच......शरीरानं तर अर्धमेला झालोय...मरेपर्यंत निदान माझं मन तरी जिवंत राहू दे...

**रोझी :** तुम्ही असा निराशावादी विचार का करता ? उलट या वस्तू इथं ठेवल्या तर आपल्याला स्केच काढायचंय....आदिमायेचं शिल्प पूर्ण करायचंय...या भावनेनं मन एवढं उचल खाईल की ते शरीरालाही बरोबर घेऊन उठेल...

**सिस्टर :** पुरे झाल्या गप्पा रोझी....पेशंटला विश्रांती हवीय...

**रोझी :** ओ. के. मी निघते. पण स्केचबुक इथंच ठेवून जाते. अंकल, तुम्ही मला स्केच काढून द्यायचंय...

( कुबड्या घेऊन रोझी निघून जाते......आणि एक वॉर्डबॉय......वेंधळा, पाचपोच नसलेला. येतो. )

**वॉर्डबॉय :** सिस्टर, उद्या संध्याकाळी ऑपरेशनला तुम्हाला स्वतःला हजर राहायला डॉक्टरांनी सांगितलंय....

**सिस्टर :** ( गडबडीने ) बरं बरं....तू जा....

**वार्डबॉय :** मायला ..एवढा कसा सडका पाय ?

**अभिजित :** ( चमकून ) सिस्टर.... ...कसलं ऑपरेशन ? माझ्या पायाला काय झालंय ?...पाय सडलाय...पाय कापणार ?

**सिस्टर :** ( अगतिकेने )....सगळा नाही हो...अगदी थोडासा...जीव वाचावा म्हणून...फक्त मांडी हो. मांडीपासूनच पाय कापणार...

**अभिजित :** ( किंचाळतो ) ..नाही. माझा पाय कापायचा नाही...माझा पाय कापायचा नाही....

( स्टेजवर अंधार...छिन्नीचा खण खण आवाज. अधून मधून सुरुंगाचे बु...म...बु...म असे आवाज. )

## अंक पहिला

## प्रवेश चवथा

( रात्रीची वेळ. डॉ. विकी कपूर आपल्या चेंबरमधे मेडिकल सायन्सचे एक जाडजूड पुस्तक वाचत बसला आहे. ॲड. राजगुरु येतो. )

**राजगुरु :** विकी, काल परवापर्यन्त तुला मी एक सहृदय, प्रेमळ आणि नामांकित डॉक्टर समजत होतो. पण आता मात्र...तुझ्या ठिकाणी मला एक... बौद्धिक गुर्मी चढलेला...हिंस्र–रानटी पशू दिसतोय पशू....अरे मला अभिजितच्या यातना, वेदना नुसत्या पाहावत सुद्धा नाहीत...तर तो सहन कसा करीत असेल ?

**विकी :** मग मी काय करू ? त्याला मरू देऊ ?....तो माझा पेशंट...मी त्याचा डॉक्टर...

**राजगुरु :** उगाच प्रोफेशनल एथिक्स नको ऐकवूस. तुझं काम जसं पेशंटला जगवणं, तसं माझंही काम क्लायंटला वाचवणं असतं....पण कधी कधी...तुला वेड्या माधवची केस माहितीय ?

**विकी :** नाही माहीत...

**राजगुरु :** सात खून केल्याबद्दल त्याला सेशननं फाशी दिली. हायकोर्टात ब्रीफ माझ्याकडे आली...त्याच्याबरोबर सात आठ सिटिंग्ज झाल्यावर माझ्या लक्षात आलं, तो वेडा आहे. वेडाच्या भरात त्यानं खून केले...सिद्ध करणं फार कठीण होतं....पण सारी बुद्धी पणाला लावून....रात्रीचा दिवस करून केस एनेड केली...

**विकी :** मग काय !

**राजगुरु :** मग काय ! कोर्टानं हुकूम दिला. वेडा आहे, सबब त्याला फाशी देऊ नये. आणि मेंटल हॉस्पिटलनं त्याला नकार दिला....हा व्हायोलंट खुनी वेडा. आम्ही त्याला दुरुस्त करू शकत नाही....हॉस्पिटलमधे ॲडमिट करू शकत नाही. बारा वर्षे झाली. माणसासारखा माणूस फाशीगेटच्या अंधाऱ्या कोठडीत सडतोय... हा काय न्याय झाला ? सुधारू शकत नाही तर निदान त्याला फाशी तरी द्या....

**विकी :** वा ! छान ! ! तुझा न्याय भलताच निष्ठुर दिसतोय. तुझ्या न्यायानं नि

ऑजिकनं चालायचं ठरवलं...तर हॉस्पिटलमधे खाटिकखाने होतील खाटिकखाने....आणि डॉक्टरांचे होतील सराईत खुनी...रोग बरा करता येत नाही. मग रोगीच मारून टाका.

**राजगुरु** : खाटिकखाना...खुनी...काहीतरी काय बडबडतोस ? मी काय तुला खून करायला मागतोय...एवढंच सांगतोय जबरदस्तीनं त्याच्यावर उपाय करू नकोस....एक तपस्वी, महान कलावंत...भीष्माप्रमाणं इच्छामरण मागतोय...

**विकी** : ( उपहासाने )...इच्छामरण ? भीष्माचार्य ?? शरपंजरी...अरे, नशीब त्या भीष्माचं....कुरुक्षेत्रावर कुठलं पोलीस ठाणं नव्हतं...नाहीतर कुणीही बक्कलवाल्यानं मानगुटीला पकडून लॉकअपमध्ये बंद केलं असतं...आत्महत्येचा प्रयत्न....भीष्मानं जीव दिला ..तर ते इच्छामरण...बेकार भिकाऱ्याने गरिबीला कंटाळून गाडीखाली उडी टाकली तर ती आत्महत्या. मेला तर आत्महत्या....जगला तर गुन्हा !

**राजगुरु** : शब्द करून अर्थाचा अनर्थ करू नकोस...खून, आत्महत्या माणसं क्षणिक भावनातिरेकानं करतात...पण इच्छामरण ?

**विकी** : इच्छा आणि भावनेत काय फरक ? प्रत्येक माणसाला आयुष्यात केव्हाना केव्हातरी वाटतं...नको ते आयुष्य ..म्हणून काय प्रत्येकानं जीव द्यावा ?... आज सकाळी नवीन मिडवाईफ ड्यूटीवर रिझ्यूम झालीय. चांगली छान आहे.... मलाही झाली क्षणभर भावना...मी काय जाऊन तिच्यावर रेप करायचा ?

**राजगुरु** : डोण्ट स्पीक रबिश...

**विकी** : डोण्ट स्पीक फूलिश...कोणतीही इच्छा...भावना, विचार न करता पूर्ण करणं म्हणजेच विकृती !

**राजगुरु** : ( हताशपणे ) अरे माझ्या मित्रा, गेले चार महिने झाले. सातत्यानं तो इच्छामरण मागतोय. कोणत्याही भावनेच्या भरात, क्षणिक इच्छेच्या वेडात नाही....इच्छामरण मागायच्या आधी आपण बरे होऊ शकत नाही याची त्यानं पक्की खात्री करून घेतलीय....

**विकी** : पक्की खात्री...तू कधी सिद्धिविनायकाला गेलास का ?

**राजगुरु** : नाही....देवाधर्माशी माझा दूरान्वयानंही संबंध नाही.

**विकी** : ते दिसतंयच....अरे सिगरेट पेटवायला माचीस मागावी तितक्या सहजपणे तू दुसऱ्यासाठी मरण मागतोयस तेव्हाच मी ओळखलं...

**राजगुरु** : माझा देवाधर्माशी संबंध नाही....पुढे बोल....

**विकी** : त्या मंदिराच्या फूटपाथवर एक तिशीचा भिकारी....जन्मताच ॲबनॉर्मल बेबी....हातापायाच्या जागी सडक्या बटाट्याला यावे तसे नुसते कोंब ! नुसतं धड आणि डोकं. त्याची खात्रीय. त्याला हातपाय फुटणार नाहीत...तरी तो

जगतोय...' भजन करा हो रामाचे, रामाचे...सार्थक झाले जन्माचे हो जन्माचे...'

**राजगुरु** : तो जगतोय...असलं गलिच्छ, हीन दीन जीवन जगतोय...कारण मृत्यूला सामोरं जायची त्याची हिंमत नाही.

**विकी** : अहं !...मृत्यूपेक्षा भयाण आणि क्रूर जीवन तो जगतोय ! कारण जीवनाला सामोरं जाण्याची त्याच्यात हिंमताय् !

**राजगुरु** : या बाजूनं नाहीतर त्या बाजूनं ! युक्तिवाद कसाही करता येतो...

**विकी** : वकिलाला. मला नाही....

**राजगुरु** : ( कावून ) ठीक आहे रे बाबा...त्या भिकाऱ्यात जीवनाला फेस करायची हिम्मत आहे....मान्य करतो. ॲप्रिसिएट करतो मी....सिद्धिविनायकाच्या नाही, तरी त्याच्या दर्शनाला मी जाईन...गणपतीपुढे नाही पण त्याच्या पुढे एकवीस मोदक ठेवीन...तसंच तूही ॲप्रिसिएट कर ना....अभिजितमध्ये मरणाला सामोरं जायची हिम्मत आहे.

**विकी** : कशावरून ? तू म्हणतोस म्हणून ?

**राजगुरु** : बोंबला ! का ? कशासाठी ? कशावरून ? केव्हा ? कधी ? कसं ? कुठे ? पुन्हा का ? कशासाठी ?....केव्हा ?....अरे साधा सरळ विचार कर...

**विकी** : साधा सरळ विचार कर...म्हणजेच विचार करू नकोस...अविचार कर.... अविचाराला सरळ विचार म्हण....

**राजगुरु** : तो अविचार नाही....पण फार विचार करू नये माणसानं...विचाराच्या चक्रव्यूहात सापडतो आपण ..आणि तुला अविचार करायची सवय आहे.... कधी कधी भीती वाटते...विचार करून करून तू वेडा होशील....आणि काही वेडंवाकडं करून बसशील...छे तुझ्याशी वाद म्हणजे त्याला अंतच नाही.

**विकी** : आहे. अंत आहे. युक्तिवाद नाही... आपण प्रत्यक्ष प्रचीतीच घेऊ... बघू या, तो मरणाला सामोरा जाऊ शकतो का.... गेला तर मी मरू देईन... नाहीतर तू तुझी भुणभुण थांबावयची.... चल.... ॲसिड.... ॲसिडची बाटली कुठाय ?

( इकडे तिकडे शोधून खणातून बाटली काढतो. )

**राजगुरु** : ॲसिडची बाटली कशाला ?

**विकी** : गँगरीन झालंय पायाला... ओततो थोडं पायावर... साला निर्जंतुक होऊन तरी मरेल....

( दुसऱ्या खणातून कोयता काढतो. )

**राजगुरु** : विकी... विकी... तुला वेडबिड लागलंय का ?

**विकी :** ( पिसाटून ओरडतो. )....अरे चल, बघू या प्रचीती... इच्छामरण... मरायचंय काय ?

**अंधार**

## अंक पहिला — प्रवेश पाचवा

स्थळ : अभिजितची खोली.

[ सिस्टर अभिजितचं टेंपरेचर पाहत आहे. इतक्यात डॉ. विकी संतापलेल्या अवस्थेत येतो. मागोमाग ॲड. राजगुरु डॉक्टरांच्या हातात ॲसिडची बाटली आणि खिशात स्कॅलपेल आहे. ]

**विकी :** ( बाहेरूनच ) कमॉन– कमॉन. एका मिनिटातच त्याला होता की नव्हता करून टाकतो.

**राजगुरु :** ( डॉक्टरांना अडवीत ) डॉक्टर प्लीज–प्लीज–

**विकी :** डोन्ट यू टच मी.

**सिस्टर :** काय झालं डॉक्टर ?

**विकी :** ( सिस्टरला ) तुम्ही बाजूला व्हा आधी. ( अभिजितकडे झेपावतात. ) ह्या हरामखोराच्या सडलेल्या पायावर ॲसिडची बाटलीच ओततो. म्हणजे सगळीच कटकट संपेल एकदाची !

**सिस्टर :** ( घाबरून ) नाही–नाही डॉक्टर.

**विकी :** ( तिला बाजूला करीत ) चल, दूर हो ! ( बाटली उघडतात ) घे. मरायचंय ना तुला ? आताच नरकात पाठवतो तुला ( सिस्टर मध्येच आडवी येते. तिला दूर ढकलून ॲसिड अभिजितच्या पायावर ओततात. ) चल बाजूला हो !

**सिस्टर :** ( किंचाळत ) नाही–नाही हे काय करताय तुम्ही डॉक्टर ?

**राजगुरु :** ( घामाघूम झालेला. फोनकडे धावतो–ओरडतो ) पोलीस-पोलीस–खून–खून–( घाईघाईत फोन फिरवू लागतो. )

**सिस्टर :** डॉक्टर–प्लीज.

**विकी :** ( खिशातून स्कॅलपेल काढून ) तुला मरायचंय ना ? पाहतो आता तुला कोण वाचवतंय ते ! ( एकदम अभिजितवर स्कॅलपेल उगारतो. राजगुरु, सिस्टर मोठ्यांदा किंचाळतात. अभिजित मात्र शांत आहे. सिस्टर अभिजितच्या अंगावर आडवी पडते. )

**सिस्टर :** डॉक्टर, तुमचं डोकं तर फिरलं नाही ?

**राजगुरु :** ( फोन सोडून धावत येतो. डॉक्टरला मागे खेचू लागतो. तोंडाने 'पोलीस पोलीस' ओरडणे चालूच आहे. ) डॉक्टर काय चालवलंयस काय तू ?

**विकी :** तुझ्या म्हणण्याप्रमाणेच वागतोय मी.

**राजगुरु :** ( अजीजीने ) फॉर गॉडस सेक, स्टॉप धिस मॅडनेस ( डॉक्टर राजगुरूंना दूर ढकलतो. सिस्टर नॅपकिन घेऊन अभिजितचा भिजलेला पाय पुसू लागते. )

**विकी :** व्हॉट दि हेल आर यू डुईंग ?

**राजगुरु :** ( थरथरत ) आय विल–आय विल–टेक यु टू द कोर्ट–आय विल रूईन यू–आय विल किल यू !

**विकी :** व्हॉट फॉर ?

**राजगुरु :** एका असहाय्य पेशंटवर ॲसिड फेकल्याबद्दल.

**विकी :** ( बाटली उघडून ॲसिड राजगुरूवर फेकतो. राजगुरु किंचाळतो. सिस्टर तोंड झाकून घेते. )

**राजगुरु :** ( किंचाळत रुमालाने तोंड पुसता पुसता ) यू—यू ल्यूनॅटिक—यू इनूसेन—यू मर्डरर—

**विकी :** ॲडव्होकेट राजगुरु, घाबरलास–किंचाळलास ना ? अरे, मरण तर दूरच राहिलं. मरण्याच्या नुसत्या विचारानंच कसे हवालदिल झालात ते कळलं ना ? मरण इतकं साधं–सोपं नसतं, महाशय ! ( बाटली राजगुरूच्या अंगावर भिरकावीत ) घ्या, ॲसिड नाही हे–डिस्टिल्ड वॉटर आहे नुसतं, आणि ह्या स्कॅलपेलनं माणूस काय पण मच्छरदेखील कापला जाणार नाही.

**राजगुरु :** ( आश्चर्यचकित होत ) काय ? ह्या...ह्या....सगळ्यांचा अर्थ काय ?

**विकी :** अर्थ एकदम सोपा आहे, वकीलसाहेब. तोंडानं इच्छा-मरणाच्या बाता मारणारे प्रत्यक्ष मृत्यू समोर उभा ठाकल्यानंतर कसे भागूबाईसारखे दूर पळतात, ते प्रत्यक्ष अनुभवलंत् ना ?

( राजगुरु शरमिंदा बनून बाजूला जातो. )

**राजगुरु :** आय ॲम सॉरी, डॉक्टर. पण हा अभिजित आपलं जीवनातलं एक ध्येय पूर्ण करू शकला नाही आणि म्हणून तो निराश बनून–

**विकी :** ध्येय पूर्ण करण्यासाठी माणसं प्राण पणाला लावतात. प्राणांचा त्याग करीत नाहीत. नाहीतर हसतमुखानं फासावर चढणारे हुतात्मे आणि भ्याडपणानं आत्महत्या करणाऱ्या नामर्दांच्या समाध्या एकाच ठिकाणी बांधल्या गेल्या असत्या !

( हळूहळू प्रकाश कमी होत जातो आणि–पडदा. )

**अंक पहिला समाप्त**

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाचनालय शाखा.
वा. क्र. 29883 ता. नि. 28/11/88
वि. 8/124 क्र.

अंक दुसरा

प्रवेश पहिला

( पडदा उघडतो. कॉरीडॉरच्या उजव्या विंगेतून प्रकाशझोत नि अभिजितचा आरडाओरडा ऐकू येतो. पडदा उघडतो. तीन काळया सावल्या स्ट्रेचर घेऊन भिंतीवर डावीकडे सरकत जातात. ऑपरेशन थिएटरकडे नि स्टेजभर प्रकाश. उजव्या विंगेतून स्ट्रेचर घेऊन वॉर्डबॉय, सिस्टर स्टेजवर येतात.... स्ट्रेचरवर अभिजित पडलेला आहे. त्याच्या पाठोपाठ राजगुरु... अभिजित ओरडतोय... )

**अभिजित :** ( घामाघूम ) नाही... कधीही नाही...मी माझा पाय कापू देणार नाही....माझा पाय कापायचा नाही....

**सिस्टर :** ( समजावत ) असं काय करता ?....पाय कापला नाही, तर जिवाला धोका आहे तुमच्या.

**अभिजित :** मी मेलो तरी चालेल... पण लंगडा थोटका म्हणून मला जगायचं नाहीय...

**सिस्टर :** तुम्ही जगला नाही... तर आदिशक्तीचं शिल्प कोण पूर्ण करणार ?

**अभिजित :** नाही पूर्ण झालं तरी चालेल.... मला माझा पाय कापू द्यायचा नाही...

**सिस्टर :** तुम्ही घाबरता कशाला लहान मुलासारखे ? तुम्हाला कळायचं देखील नाही केव्हा पाय कापला ते ! अर्ध्या तासात ऑपरेशन संपेल... सगळी तयारी झालीय.... ॲनेस्थेटिस्ट आलाय... सगळी तयारी झालीय...

**अभिजित :** तयारी तुमची झालीय...माझी नाही...

**सिस्टर :** बॉय, चल काही ऐकू नकोस...

[ बॉय स्ट्रेचर डाव्या विंगेकडे न्यायला लागतो... अभिजित त्याच्या हाताला चावतो. बॉय हात झटकतो....अभिजित ओरडतो... ' विकी ऽऽ विकी ऽऽ बाहेर ये... ' ]

**विकी :** काय अभिजित ?

**अभिजित :** विकी, तूच परवा बोलला होतास.... जे देता येत नाही ते मी हिरावणार

नाही.... मग माझा पाय कशाला कापतोस? तू मला पुन्हा पाय देऊ शकतोस?

**विकी :** हो... देऊ शकतो. म्हणून तर कापतोय...अगदी खऱ्याखुऱ्या पायासारखा पाय तुला मी बसवू शकतो... आर्टिफिशियल.... तू व्यवस्थित चालू शकशील...काम करू शकशील....

**अभिजित :** पण केव्हा? कसा?...तुला माहितीय माझ्या रोगावर उपाय नाही... आज तू हा पाय कापणार....उद्या दुसरा सडला की दुसरा....मग हात कापणार....पुरतं मला एकदा कापून टाक ना!

**विकी :** अभी, अशी कापाकापी करायला मी काय मटण मार्केटातला खाटीक आहे का? जर तुझ्या रोगावर इलाज नसता, तर पाय कापायचा मी निर्णय घेतला असता का?

**अभिजित :** काय? काय इलाज आहे? वर्षभर का नाही केलास...

**विकी :** अभी, तुला म्हटलं ना मी? मेडिकल जर्नलमधे तुझी केस मी प्रसिद्ध केली होती....हे बघ (खिशातून कागद काढतो. जगातून तीन डॉक्टरांनी उपाय सुचवलेत...नव्या औषधांचे फॉर्म्युले पाठवलेत...

**अभिजित :** बघू . मला बघू....

**विकी :** (कागद खिशात घालीत) डॉक्टरांचं हस्ताक्षर कंपाऊंडरशिवाय कोणाला कळतं? आणि वाचून तुला काय कळणाराय?...विश्वास नाही माझ्यावर? शपथपूर्वक सांगतो अभी तुला....तू खडखडीत बरा होणारायस....वर्षभराच्या आत....मग...मग मी तुला स्वतःचा आदिशक्तीच्या शिल्पापाशी घेऊन जाईन...मग माझ्यासमोर छिन्नीच्या चार ठोक्यांत...तू खोदायचंयस....' हे शिल्प, डॉक्टर विकी कपूर यांच्या अहोरात्र परिश्रमाने पूर्ण झाले!'

**अभिजित :** (क्षणभर विश्वास बसून) खरंच? विकी मी पुन्हा पहिल्यासारखा खडखडीत बरा होईन...

**विकी :** पुन्हा शपथपूर्वक सांगू?....अरे, ड्रग रीसर्च लॅबोरेटरीत फॉर्म्युल्यांचे इफेक्ट, आफ्टर इफेक्टस तपासले जातायत...महिन्या दोन महिन्यांत माझ्या हातात औषधं पडतील....आणि शपथपूर्वक सांगतो तुला अभी...ज्या दिवशी मी स्वतः निराश होईन, पराभूत होईन...त्या दिवशी तुला सुखानं मरू देईन...

**अभिजित :** विकी, माझ्या पायाला गँगरीन झाल्याचं तुला केव्हा कळलं?

**विकी :** झाले चार दिवस.

**अभिजित :** मग त्याच दिवशी का नाही पाय कापलास?

**विकी :** अरे, माणसाचा पाय कापून फेकून देणं म्हणजे काय भलती थट्टा ..मला पूर्ण बुद्धीची, मनाची खात्री करून घ्यायला लागली. मग ऑपरेशनच्या तयारीत वेळ गेला.

**अभिजित :** विकी, पाय कापायची तयारी करायला तुला चार दिवस लागले.... मला पाय कापून घ्यायचाय....मनाची तयारी करायला मला दोन दिवस तरी दे.

**विकी :** ( क्षणभर विचार करून ) असं म्हणतोस ? ठीकय. आज गुरुवार...परवा शनिवार...चल अर्धा दिवस जास्त देतो...रविवारी सकाळी आपण ऑपरेशन करू...बॉय याला परत घेऊन जा...

**अभिजित :** थँक्यू...थँक्यू व्हेरी मच विकी...

( वॉर्डबॉय अभिजितला परत स्ट्रेचरवरून त्याच्या खोलीत घेऊन जातात. पाठोपाठ राजगुरु. विकी देखील निघतो. तोच— )

**सिस्टर :** डॉक्टर रागावणार नसाल तर...एक विचारू ?

**विकी :** काय ?

**सिस्टर :** तुम्ही खोटं का बोलता आहात ? कोणीही या रोगावर संशोधन करत नाहीय...कोणीही या रोगावर औषध सुचवलेलं नाहीय...तरी तुम्ही खोटं का बोलता ? ( विकी नुसता गप्प उभा....) डॉक्टर, त्याच्या यातना मलासुद्धा पाहावत नाहीत. एवढी वर्षं हॉस्पिटलमध्ये काम करूनही ! त्याला दयामरण का देत नाही ? ( विकी गप्पच.)...डॉक्टर, मेडिकल कॉलेजमधे असताना ' मर्सी-किलिंग असावं की नसावं ' या वादस्पर्धेत तुम्ही भाग घेतला होता. आणि पेशंटच्या सुखासाठी....शांत मृत्यूसाठी मर्सीकिलिंग केलंच पाहिजे म्हणून वाद घालून स्पर्धा जिंकली होतीत. मग आजच तुमचा मर्सी किलिंगला एवढा विरोध का ?

**विकी :** सिस्टर, स्पर्धा जिंकली....तेव्हा वादविवाद स्पर्धा जिंकावी एवढीच माझी महत्त्वाकांक्षा होती. तेव्हा, एक हुशार पण इम्मॅच्युअर मुलगा होतो मी ! आता प्रथम एक मॅच्युअर माणूस आहे मी....नंतर डॉक्टर ! आयुष्य म्हणजे काय ते आता मला समजतंय !

**सिस्टर :** काय ?

**विकी :** सिस्टर, माणसांचं जीवन म्हणजे निव्वळ अन्न, वस्त्र आणि वंशविस्तार, निवारा नाही.... माणसाचं जीवन म्हणजे... खोटं स्वप्नरंजन, खोटा आशावाद आणि खराखुरा प्रयत्नवाद !

**सिस्टर :** खराखुरा प्रयत्नवाद ?... खोट्या आशेपोटी ? खोट्या स्वप्नापोटी ?

**विकी :** सिस्टर, खोट्या गोष्टींसाठी खरेखुरे प्रयत्न केले म्हणून तर एका द्विपाद जनावराचा माणूस झाला ना ? सूर्याची पूजा करता करता दगडावर दगड घासून त्याने अग्नी निर्माण केला.... आता अणुस्फोट.... पुष्पक विमानाची रसभरित वर्णनं करता करता.... आता चंद्रालाही त्यानं पायाखाली घातला ना ? सगळी स्वप्नं शेख महंमदी होती... पण वेड्या आशेनं प्रयत्नपूर्वक माणसानं ती वास्तवात आणली.

**सिस्टर :** याचा अभिजितशी काय संबंध ?

**विकी :** नाही कसा ? अभिजितदेखील माणूस आहे. जो खुळी स्वप्नं, वेडी आशा हरवून बसलाय !... निराश झालाय... म्हणून तर मृत्यू मागतोय.... सिस्टर माणसात निराशावाद... वैफल्यवाद मी कधीच निर्माण होऊ देणार नाही...

**सिस्टर :** का ?

**विकी :** कारण, मग माणसं जगूच शकणार नाहीत.... सिस्टर, म्युनसिपालटीच्या हॉस्पिटलमध्ये इंटर्नशिप करताना हजारो अडाणी, अशिक्षित, दरिद्री, दुःखी पेशंटस पाहिलेत मी. अगदी प्रतिकूल परिस्थितीत हतबल असूनही जगत होते, धडपडत होते.... निव्वळ खोट्या स्वप्नांवर, खोट्या आशेवर... सिस्टर, नव्वद टक्के माणसं निरर्थक आयुष्य जगत असतात.... त्यांना मी काय मारण्याचा सल्ला देऊ ?

**सिस्टर :** पण या असंख्य शारीरिक यातना...

**विकी :** यातना या फक्त काय शारीरिक असतात ? त्या मानसिकही असतात. आर्थिकही असतात... प्रत्येकजण कसल्या ना कसल्या यातनेनं, वेदनेनं पछाडलेलाच असतो !... यातना हे काही मृत्यूला निमंत्रण देण्याचं कारण नाही होऊ शकत.... जर उद्या तुझ्या रोझी.... ( थबकतो. )

**सिस्टर :** ( भेदरल्या सुरात )....रोझीचं काय ?

**विकी :** रोझीच्या हसऱ्या डोळ्यांमध्ये निराशा दाटून आली...आपल्याला बापाचं छत्र नाही....कोणी भावंडं नाही...आपण दरिद्री आहोत......त्यात पुन्हा पांगळ्या...इतर मुलींबरोबर आपण ट्रिपलाही जाऊ शकत नाही. आपलं लग्न होण्याची शक्यता नाही. या जगात आपला कसा टिकाव लागायचा ? आई-नंतर आपलं काय होईल ?...आणि तिनं आत्महत्येचा विचार केला तर ?

**सिस्टर :** ( रडवेल्या स्वरात ) प्लीज, डॉक्टर, असं काही बोलू नका.

**विकी :** तर सिस्टर, मी रोझीला म्हणेन....खुळे, असा काय विचार करतेस....अग, तू किती सुंदर आहेस, हुशार आहेस......पायच फक्त पांगळे ना ? अग ते देखील ठणठणीत होतील....मेडिकल सायन्स किती ॲडव्हान्स झालंय....... उपचार चालू ठेव....दोन पाच वर्षांत तू खडखडीत बरी होशील. इतर मुलीं-सारखी झिम्मा फुगडी खेळू शकशील...दोरीवरच्या उड्या मारू शकशील.... मी तिचा हात हातात घेईन....आणि हातावरल्या रेषा पाहून........मला काही समजत नाही, कळत नाही, विश्वासही नाही—तरी पण तिला तिचं भविष्य सांगेन...तुझं लग्न कुणा राजपुत्राशी होणार आहे—आणि सिस्टर, हे सगळं तिला मी शपथपूर्वक खोटं सांगेन...!

**सिस्टर :** (गहिवरून)....डॉक्टर, रोझीची शपथ...तुमच्या एवढा खरंखुरं बोलणारा मनुष्य मी अजून पाहिला नाही...

(सारंगीचे करुण सूर आणि हळूहळू अंधार)

## अंक दुसरा — प्रवेश दुसरा

(स्ट्रेचरवरून वॉर्डबॉय अभिजितला रूममधे आणतात......पाठोपाठ राजगुरु...वॉर्डबॉय अभिजितला उचलून खुर्चीत बसवतात....तेवढ्याशा त्रासाने अभिजितला घाम फुटतो....तो अस्फुट ओरडतो....वॉर्डबॉय निघून जातात.......राजगुरु रुमालाने अभिजितचा घाम पुसतो. त्याला घोटभर पाणी पाजतो....)

**राजगुरु :** चला,...आजचं मरण दोन दिवस पुढे लोटलं गेलं...पण अभी, दोन दिवसांत पाय गमवायची तुझ्या मनाची तयारी करून दुसराच निर्णय घेण्याची मनाची तयारी होईल ?

**अभिजित :** नाही.... मी मनाची तयारी करून दुसराच निर्णय घेतलाय....तो अंमलात आणायला हा दोन दिवसांचा अवधी तेवढा मागून घेतलाय...

**राजगुरु :** काय निर्णय घेतलायस ?

**अभिजित :** आधी दरवाजा बंद कर... आणि सिस्टर आली तर ओरडून सांग. थांब.... मी लघवीचं भांडं घेतलंय—

(राजगुरु दरवाजा बंद करतो. लघवीचे भांडे स्टुलावर ठेवतो...त्यात पाणी ओततो.)

**राजगुरु :** हं.... आता बोल....

**अभिजित :** या विकीनं खोटं बोलायची शपथ घेतलीय की काय कोणास ठाऊक ? ....पण लेकाचा इतका मनापासून खोटं बोलतो की क्षणभर मलाही आशा वाटते.. मी खडखडीत बरा होईन... आदिशक्तीचे शिल्प पूर्ण करीन... पण माझी पक्की खात्री आहे मी बरं होण्याची कणभर देखील शक्यता नाही. या विकीनं कितीही जगवायचा प्रयत्न केला, तरी हालहाल होत वर्षभरात मी मरणार आहे.... आणि म्हणून गेले दोन महिने मी त्याला सांगतोय... मला सुखानं मरू दे.... जगवू नकोस... पण साला ऐकतच नाही....

**राजगुरु :** तो ऐकणार नाही... तुला मरू देणार नाही.... अरे जरी एम्. डी. एम्. एस्. एफ. आर. सी. एस. फॉरेन रीटर्नड असला, तरी तो सायंटिफिक रॅशनली विचार करू शकत नाही... बुद्धिप्रामाण्यवाद त्याच्यात बिलकूल नाही.... अगदी देवभोळा, श्रद्धाळू...दुबळ्या मनाचा माणूस !— याची आई, सत्तरीची म्हातारी.... तिला आतड्याचा कॅन्सर झाला होता.... मी म्हटलं,

म्हातारीला सुखानं मरू दे... तर म्हणाला, नाही माझी देवावर श्रद्धा आहे. ती बरी होईल... सकाळी उठून सिद्धिविनायकाला जाऊन आला.... नि घेतली ऑपरेशन टेबलवर.... म्हातारी टेबलावरच खलास !... ज्या आईच्या पोटी जन्म घेतला, तिला त्यानं टेबलावर फाडून मारली.... मग बसला रडत.... माझंच ज्ञान कुठंतरी कमी पडलं... तरी अजून त्याचा देवावरचा विश्वास नाही उडाला ! अजून कोणतंही मेजर ऑपरेशन असो... अगदी ट्रकखाली सापडलेला रस्त्यावरचा भिकारी असो... जसा काही आपला बापच मरायला टेकलाय असा कासावीस होतो... ऑपरेशनच्या आधी सिद्धिविनायकाला जाऊन येतो. पेशंट वाचला तर म्हणतो, सिद्धिविनायकाची कृपा. मेला तर स्वतःला दोष देत बसतो... मी जर त्याच्या जागी असतो, तर अभी, तू कोमामध्ये होतास तेव्हाच ऑक्सिजन आणि सलाईन बंद करून तुला सुखानं मरू दिलं असतं.... पण विकी... नाही तुला मरू देणार.... तो अतिशय दुबळा आहे.

**अभिजित :** तो दुबळा नाहीय रे...बहुतेक दुबळी माणसं दुबळेपणानं देव मानतात. पण काही माणसं देवावर श्रद्धा ठेवतात म्हणूनच दुबळी राहात नाहीत. कोणत्याही संकटाला निर्विकारपणे सामोरी जातात....हा विकी दुबळा असता तर घरचा अत्यंत दरिद्री असूनही, पोट बांधून, हौसमौज मारत, काबाडकष्ट करीत, शिकू शकला असता ? सगळे डॉक्टर यू. के. नाहीतर स्टेटस्‌ला जायला पळतात. शिक्षण संपल्यावर हा मात्र तिकडची गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून भारतात परतला....

**राजगुरू :** कशाला ?

**अभिजित :** म्हणाला, 'तिथल्या माणसांपेक्षा इथल्या माणसांना माझी जास्त गरज आहे...' आणि अपंगांसाठी हॉस्पिटल काढायला त्यानं दहा लाख रुपये कर्जाऊ मागितले....

**राजगुरू :** मग ?

**अभिजित :** मी नाही म्हणालो ! तर, सिद्धिविनायकाची शपथ घेऊन म्हणायला लागला, तुझी पै न पै चुकती करीन...मी हसलो, म्हणालो...विकी कशाला गणपतीची शपथ घेतोस ? गणपती तुझा देव नाही....शेंदूर...हिंदू तुझा धर्म नाही....तुझे देव अश्विनीकुमार आणि तुझा धर्म वैद्यकी ! तू डॉक्टरी शिकला नाहीस. तू वैद्यकीची तपश्चर्या केलीयस. धर्माचा धंदा करणं तुला जमणार नाही. माझे तर पैसे बुडतीलच, तूही कर्जबाजारी होशील....कुठल्यातरी मोठ्या हॉस्पिटलमध्ये नोकरी पकड...पैसे कमवायचे असतील तर पुन्हा अमेरिकेला जाऊन तिकडे नोकरी पकड...पण राजगुरु, तो पुन्हा अमेरिकेला परतला नाही. एवढं शिकून, इतकं कौशल्य ज्ञान असून...या इथं अडीच तीन हजाराची नोकरी

करतोय.... हॉस्पिटलच्या छोट्या कोंदट क्वॉर्टरमधे संसार करतोय... विकी इज ए जेम... हिरा आहे तो हिरा... देवमाणूस आहे. आणि म्हणून मला तो मरू देत नाहीय...

**राजगुरु :** मग यातनं मार्ग काय ?

**अभिजित :** तेच तुला सांगतोय....यातनं तू मार्ग काढ...! अगदी कायदेशीर ! सुखानं मेलो, तर माझी सगळी इस्टेट तुला देईन....

**राजगुरु :** इस्टेटीचं राहू दे.. माझी फी मला दिलीस तरी पुरे....पण अभी, कायदेशीर मार्ग नाही. आजच्या कायद्याप्रमाणे दयामरणाला...मर्सी किलिंगला परवानगी नाही....

**अभिजित :** पण का ?

**राजगुरु :** कारण या देशातले सगळेच डॉक्टर काही विकी कपूर नाहीत. सगळ्यांचाच वैद्यकी हा धर्म नाही. बहुतेकांचा डॉक्टरी हा धंदा आहे ! कायद्याच्या आवरणाखाली, मर्सी किलिंगच्या नावाखाली, पैशाच्या लोभानं चक्क खून देखील पाडतील....खून !

**अभिजित :** राजगुरु, जर मी देखील कायद्याच्या आवरणाखाली मर्सी किलिंग करून घेतलं तर ?

**राजगुरु :** ( टाळी वाजवत ) दॅट्स इट अभी...तू विकीविरुद्ध, या सिटी हॉस्पिटल विरुद्ध केस करू शकतोस ?

**अभिजित :** काय ?

**राजगुरु :** ...की तुझा सिटी हॉस्पिटलच्या आणि विकीच्या ट्रीटमेंटवर विश्वास राहिलेला नाही...गेल्या वर्षभरात तुझ्या प्रकृतीत सुधारणा नाहीच. उलट यांच्या निष्काळजीपणानं गँगरीन होऊन पाय कापायची वेळ आलेली आहे. सबब, तू घरी जाऊन दुसऱ्या डॉक्टरांकडून इलाज करून घेऊ इच्छितोस ! तरी हॉस्पिटलनं तुला घरी जाण्यासाठी डिसचार्ज द्यावा....इलाज कोणाकडून करून घ्यावा याचं तुला व्यक्तिस्वातंत्र्य आहे....नि विकीशिवाय दुसरा डॉक्टर तुला जगवू शकणार नाही....तू सुखानं मरशील !

**अभिजित :** पण अशा केसनं या हॉस्पिटलची, विकीची बदनामी होईल.

**राजगुरु :** हॉस्पिटलच्या बदनामीला मार गोळी... सरकारी हॉस्पिटलं सदा बदनामच असतात... खाजगी डॉक्टर प्रचारानं, नि सरकारी डॉक्टर स्वतःच्या आचरणानं सरकारी हॉस्पिटलं दररोज बदनाम करीतच असतात... आता या वॉर्डाचा विकी प्रमुखच म्हणून सोडून दे... इतर वॉर्डात जाऊन पहा... एकेक नमुनेदार डॉक्टर, नर्सेस, पेशंटशी कसे वागतात.... हां.... पण विकीची देखील बदनामी होईल हे खरं !

**अभिजित :** आणि जर, माझ्यासारख्या श्रीमंत, प्रतिष्ठित, प्रख्यात माणसानं जाहीर-रीत्या विकीला बदनाम केलं तर.... त्याची नोकरीदेखील जाईल.... क्वार्टर्स जातील, पोराबाळांसकट तो उघड्यावर पडेल... आणि या बाजारू जगात तो दीड दोन हजार रुपयेदेखील महिन्याला कमवू शकायचा नाही...

**राजगुरु :** अरे, पण जो तुला सुखानं मरूसुद्धा देत नाही, तो सुखानं कसा जगेल याची तुला चिंता कशाला ?

**अभिजित :** राजगुरु, रस्त्यावरच्या भिकाऱ्यासाठीसुद्धा ज्याचा जीव कासावीस होतो.... त्याच्यासाठी माझा जीव थोडादेखील तुटू नये का ?

**राजगुरु :** ( विचार करीत ) मग तू असं कर... तुझ्या मृत्युपत्रात दोन तीन लाख रुपये त्याच्या नावानं करून ठेव...

**अभिजित :** येस... ही कल्पना चांगली.... म्हणजे मीही सुखानं मरू शकेन आणि नोकरी गेली तरी तोही सुखानं जगू शकेल.... !

**राजगुरु :** तर ठरलं... मी आजच कोर्टात दावा दाखल करतो... नि निकाल लागेपर्यंत तुझ्या पायाचं ऑपरेशनही थांबवतो...

( बोलता बोलता राजगुरु एकदम थबकतो. कानोसा घेतो. नि फटकन दरवाजा उघडतो... दरवाजाला कान लावून चोरून ऐकणारी सिस्टर धडपडत आत येते. तिचे डोळे विस्फारलेले, चेहरा संतापलेला. राजगुरु तिच्यावर संतापून ओरडतो. )

**राजगुरु :** सिस्टर, चोरून ऐकणं गुन्हा व पाप आहे माहीत नाही का ?

**सिस्टर :** ( ओरडत ) चोरून बोलणंही पाप आहे. गुन्हा आहे.... तुम्ही वकील नाही. क्रिमिनल आहात .. सराईत गुन्हेगार... मी आता जाऊन डॉक्टरांना सांगते, तुम्ही अभिजितच्या खुनाचा कट करताय कट .. खुनी आहात तुम्ही खुनी !

( सिस्टर ओरडत ओरडत आत जाते. राजगुरु दिङ्मूढ. हळूहळू अंधार. छिन्नी आणि सुरुंगाचे प्रतिध्वनी वाढत जातात. )

## अंक दुसरा — प्रवेश तिसरा

( डॉक्टर विकी कपूरच्या चेंबरमध्ये वयस्कर सायकिॲट्रिस्ट दिवाण बराच वेळ विकीची वाट पाहत बसले आहेत. मॅगझीनस् चाळता चाळता मधून मधून घड्याळाकडे पाहत आहेत...विकी येतो. )

**विकी :** सॉरी, डॉक्टर दिवाण ..तुम्हाला बराच वेळ थांबावं लागलं....

**दिवाण :** दॅटस ऑल राईट. आपला व्यवसायच असा....कोणती सर्जरी होती ?

**विकी :** नाही.

Dr Anil Bane

**दिवाण :** मग इतका वेळ ?

**विकी :** वकिलाकडे बसलो होतो...

**दिवाण :** ( हसून ) वकिलाकडे ?

**विकी :** हो ! दिवाणसाहेब, तुम्हाला अभिजितची केस...

**दिवाण :** माहिती आहे... दोनचारदा त्याला भेटलोही आहे.... केस अगदी कॉमन आहे.... असाध्य दुर्धर रोगानं पछाडलेल्या माणसाला डिप्रेशन येणं स्वाभाविक आहे .. त्याला वाटायला लागतं अशा जगण्यापेक्षा मेलेलं काय वाईट ? दॅटस इट ! बाकी तो अगदी नॉर्मल असतो....

**विकी :** पण आता तो ॲबनॉर्मल वागायला लागलाय...

**दिवाण :** म्हणजे कसा ?

**विकी :** त्यानं माझ्या विरुद्ध...सिटी हॉस्पिटलविरुद्ध कोर्टात अर्ज केलाय...

**दिवाण :** कोर्टात अर्ज ? काय ?

**विकी :** की गेल्या वर्षभराच्या अनुभवानंतर....त्याचा माझ्या आणि ह्या हॉस्पिटलच्या ट्रीटमेंटवरचा विश्वास उडालाय....तो घरी जाऊन आयुर्वेदिक नाहीतर होमिओपाथिक औषधोपचार करून घेऊ इच्छितो. तरीही त्याला सक्तीनं हॉस्पिटलमधे डांबून ठेवलंय....सबब त्याला घरी जाऊन दुसरे उपचार करून घेण्याची परवानगी मिळावी !

**दिवाण :** वेडा झालाय का ? त्याला समजत नाही...हॉस्पिटलमधून बाहेर पडल्या पडल्या तो मरेल.

**विकी :** वेडा नाही...फार शहाणाय तो ! घटना, कायदा यांच्या बुरख्याखाली न्याय मिळवायच्या मिषानं तो, आत्महत्येचा प्रयत्न करतोय !

**दिवाण :** तुमचे वकील काय म्हणाले ? त्याची केस कोर्टात टिकेल ?

**विकी :** टिकणार नाही आमची बाजू ! तो मात्र जिंकेल ! कोणताही डॉक्टर, हॉस्पिटल एखाद्या पेशंटवर माझ्याचकडून इलाज करून घे म्हणून जबरदस्ती करू शकत नाही....

**दिवाण :** मग यातून मार्ग काय ?

**विकी :** तोच हुडकायला वकिलाकडे गेलो होतो...नि त्यानं मार्ग दाखवला...

**दिवाण :** कोणचा ?

**विकी :** अभिजितला वेडा ठरवायचा...! कोर्टात एकदा का तो वेडा ठरला... की कोर्ट त्याला व्यक्तिस्वातंत्र्याचा फायदा देणार नाही....तो पूर्ण माझ्या ताब्यात राहील. मी ठरवेन तेवढा काळ त्याला हॉस्पिटलमधे राहावं लागेल...आणि त्यासाठी मला तुमची मदत हवीय...

**दिवाण :** मी काय मदत करू शकतो ?

**विकी :** तुम्ही फक्त सर्टिफिकेट द्या आणि कोर्टात शपथेवर खोटी साक्ष द्या की, अभिजित वेडा आहे....

**दिवाण :** एका शहाण्या माणसाला वेडा ठरवू? बेकायदेशीर होईल...आपल्या व्यावसायिक नीतीला सोडून होईल.

**विकी :** दिवाणसाहेब, एखाद्या गरीब बाईनं स्वतःच्या उपाशी तान्ह्या लेकराला दूध पाजण्यासाठी दोन चार रुपये चोरले तर ते नीतीला सोडून होईल?

**दिवाण :** ते आईच्या नीतीला धरूनच होईल...पण बेकायदेशीर ठरेल....

**विकी :** कायदा, नीती म्हणजे नेमकं काय?

**दिवाण :** ( हसून ) कायदा नीती ह्या समाजसापेक्ष कल्पना आहेत. त्या सतत बदलत असतात....जसजसा समाज बदलतो... गरजा बदलतात....ज्ञान बदलतं....

**विकी :** दिवाणसाहेब, गेल्या दहा हजार वर्षांत जेवढा माणूस बदलला नव्हता, तेवढा गेल्या पन्नास वर्षांत बदललाय...तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रगतीनं.... लागणाऱ्या नव्या नव्या शोधानं रोज बदलतोय... ! समाज बदलतोय, त्याच्या गरजा बदलताहेत....पण तेवढ्या वेगानं कायदा आणि नीतिकल्पना बदलत नाहीयत....

**दिवाण :** म्हणून तर डॉ. कपूर, माणसं अशांत, अस्वस्थ आहेत. माणसानंच निर्माण केलेले कायदे, नीतिकल्पना त्याच्या समाजाला संरक्षण देऊ शकत नाहीत...

**विकी :** मग माणसानं वागावं कसं?

**दिवाण :** ( उसासा टाकीत ) उपाय एकच. प्रत्येकानं स्वतःच्या सदसद्विवेक-बुद्धीला स्मरून, स्वतःच्या अंतरात्म्याशी प्रतारणा न करता, वागायचं.

**विकी :** जर एका माणसाला जगवायला तुमचा काहीही स्वार्थ नसताना तुम्ही त्याला वेडं ठरवलंत...तर ती तुमच्या अंतरात्म्याशी प्रतारणा ठरेल? तुमच्या सदसद्विवेक बुद्धीला टोचणी लागेल?

**दिवाण :** ( चाचरत ) नाही !...पण, अभिजित वेलनोन माणूस. त्याची केस सुरू झाली की, पेपरमध्ये रकानेच्या रकाने रिपोर्टिंग छापून येईल.......आणि जर कोर्टात माझी साक्ष, माझं सर्टिफिकेट खोटं ठरलं....तर माझी प्रतिष्ठा धुळीला मिळेल....माझं ज्ञान खोटं ठरेल.......शहाणा सोडाच पण वेडाही माझ्याकडे उपचारासाठी यायचा नाही.......माझी हजारो रुपयांची प्रॅक्टिस बुडेल.... सॉरी....सॉरी....मी असं सर्टिफिकेट देऊ शकत नाही....

( विकी खिन्नपणे विचार करीत बसतो. )

**दिवाण :** कसला विचार करताय डॉक्टर कपूर?

**विकी :** अं? मी विचार करतोय ..पूर्वीचे ज्ञानी आणि आजचे विद्वान यांच्यात असा फरक कसा पडला?

**दिवाण :** कसला फरक पडला?

**विकी :** म्हणजे पहा ना, आजचे आपले शास्त्रज्ञ या देशात आम्हाला पैसा मिळत नाही, प्रतिष्ठा मिळत नाही, म्हणून रडत रडत परदेशात निघून जातात...नि तो वेडा कोपर्निकस, सारे मूर्ख सनातनी धर्मगुरु छी थू करत त्याला जिवंत जाळायला निघाले...तरी गर्जत राहिला. 'पृथ्वी गोल आहे. ती सूर्याभोवती फिरते....' हे सत्य समाजाचा रोष पत्करून सांगून त्यानं काय पैसा मिळवला का कसला किताब ? आता आपल्याच धंद्याचं उदाहरण घ्या ना !....पूर्वीचे वैद्य....ना त्यांना कसली ग्रॅण्ट मिळत होती ना कसली फेलोशिप.......जवळ कसली साधनं नव्हती, माहिती नव्हती....तरी पण उन्हापावसाचं जंगल दऱ्यांत, रानोमाळ भटकून त्यांनी जडीबुटीची औषधं शोधून काढली ......पोथ्यांमधून लिहून ठेवली.......गाढवांनी त्या औषधांची स्वतःच्या नावानं पेटंट्स देखील नाहीत घेतली. नाही तर केवढा पैसा कमावला असता त्यांनी ? आजचे आपले डॉक्टर किती शहाणे ? औषध कंपन्यांकडनं कमिशन मिळतं, प्रेझेंटस् मिळतात... म्हणून विनाकारण अनावश्यक महागडी औषधंसुद्धा रोग्यांच्या घशांत घालून पैसा काढतात....गाड्या उडवतात...हा फरक कसा पडला डॉक्टर दिवाण ? (जरा वेळ स्तब्धता...नि एकदम हात आपटत विकी उठतो.)...हां आता आलं लक्षात ! पूर्वीचे योगी ज्ञानी ऋषीमुनी सरस्वतीची उपासना करायचे. साधना करायचे...आताचे विद्वान सरस्वतीचा वापर करतात, भोग घेतात... रांडेसारखा...दे वेअर एज्युकेटेड. वुई आर ट्रेण्ड...(पुन्हा स्तब्धता... दिवाणजी खजील.) जाऊ दे. दिवाणसाहेब, फालतू विषयावर कशाला डोकं खायचं ! आय ॲम सॉरी ..मी तुमचा बहुमोल वेळ घेतला...एवढ्या वेळात तुम्ही तीन चारशे रुपये कमावले असते....तुमच्या सारख्या वयस्कर प्रतिष्ठित माणसाला बोलावून ताटकळत ठेवलं ..तुमचा अपमान केला....दिलगीर आहे...तुम्ही जाऊ शकता...

(खालच्या मानेने उठून जाता जाता दिवाण थबकतो.)

**दिवाण :** पण त्या अभिजितचं काय होणार ?

**विकी :** काही नाही होणार ! तो मरणार ! या देशात शेकडो हॉस्पिटल्स, हजारो डॉक्टर्स आहेत....तरी तो मरणार...चांगलं होईल....नाही तर तुम्हीच सांगा दिवाणसाहेब, ज्या समाजात माणसं माणसांसाठी नाही, पैसा आणि प्रतिष्ठेसाठी जगतात....अशा समाजात त्याच्यासारखा मनस्वी कलावंत जगू कसा शकणार ?....मरू दे त्याला...लेट हिम डाय... !....(घड्याळ पाहत) तुमच्या कन्सल्टिंग रूमची वेळ झाली दिवाणसाहेब...तुम्हाला उशीर होईल... (दिवाण जड जड पावलाने जाऊ लागतो....दरवाजापाशी थबकतो....नि एकदम निश्चयाने मागे वळतो.)

**दिवाण :** डॉक्टर कपूर, आय ॲम रेडी.... आय ॲम रेडी टु गिव्ह यू द

सर्टिफिकेट.... मी कोर्टात शपथपूर्वक खोटं सांगेन की.... या अभिजितमधे हेरीडेटरी, सुसायइड टेंडसीज् आहेत.... त्याच्यामध्ये डेथ ऑब्सेशन आहे.... अभिजित वेडा आहे.... ठार वेडा आहे...

(विकी भरलेल्या डोळ्यांनी कसाबसा थँक्यू थँक्यू पुटपुटत हसू लागतो ....नि अंधार.... पार्श्वभूमीवर छिन्नीचे खण खण आवाज... मधून मधून बुऽऽम् बुऽऽम् असे सुरुंगाचे ध्वनी.)

## अंक दुसरा — प्रवेश चवथा

(संध्याकाळची वेळ. राजगुरु मोठ्या आनंदाने येतो... )

**राजगुरु :** अभी, कॉग्रॅच्युलेशन्स दे...

**अभिजित :** कोणाला ? मला स्वतःला की विकीला ?

**राजगुरु :** स्वतःला नाही... विकीलाही नाही... मला दे मला.... कोर्टात विकीचे, सिटी हॉस्पिटलचे त्या सायकिॲट्रिस्ट दिवाणासकट बारा वाजवले बारा !

**अभिजित :** (आनंदून) आपण जिंकलो ?

**राजगुरु :** जिंकल्यातच जमा आहोत...उद्या कोर्ट इथं येईल.... तुझी जबानी घेईल आणि निकाल देईल.

**अभिजित :** म्हणजे अजून आपण हरण्याची शक्यता आहे....

**राजगुरु :** बिलकूल नाही...दिवाणांची साक्ष खोटी ठरली, तेव्हाच हरण्याची शक्यता संपली....सकाळी कोर्टात प्रथम विकीनं तुला वेडा ठरवून दिवाणांचं सर्टिफिकेट सादर केलं...नि अशी चीड आली मला. ...विकीचं आय कॅन अंडरस्टॅण्ड. तुला जगविण्यासाठी तो तुलाच काय स्वतःलाही वेडा ठरवेल ! तुझा मित्रच तो. तुझ्यावर प्रेम आहे त्याचं ! पण साला हा थेरडा दिवाण.... एवढा मोठा माणूस....स्वतःच्या विषयातला बाप...काही कारण नसताना....तुला न तपासता...धडधडीत शपथेवर खोटं बोलतो....तुला वेडा म्हणतो. मग खेचला म्हाताऱ्याला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात....आणि सुरवात केली उलटतपासणीला...तुला सांगतो अभी....वकिली करता करता फोरेन्सिक मेडिकल सायन्स आणि सायकॉलॉजी मुखोद्गत झालीय मुखोद्गत...अशी भंबेरी उडवून दिली....एका प्रश्नाचं त्याला धड उत्तर देता येईना...मग शेवटचा प्रश्न विचारला...'विकी कपूर नि सिटी हॉस्पिटलकडून तुम्हाला पेशंट मिळतात म्हणून तुम्ही खोटं बोलताय ? की तुमचं ज्ञान कमी पडल्यानं चुकीचं बोलताय ?' (हसत)...म्हातारा म्हणाला, 'ज्ञान कमी पडलं म्हणून चुकीचं निदान केलं...पिंजऱ्यातून बाहेर आला तेव्हा म्हातारा थरथरत होता...नि डोळे पाणावले होते....(टाळी वाजवत) बिचारा दिवाण....

कोठनं म्हातारपणी दुर्बुद्धी झाली त्याला...काय, दोन पाच हजार खाल्ले असतील विकीकडनं त्यानं....पण आज हजारो रुपयांची प्रॅक्टिस बुडवून बसला....उद्या रकानेच्या रकाने मजकूर येणार...सारं कोर्ट प्रेस रिपोर्टर्सनी खच्चून भरलं होतं....आता उद्या माझा फोटो....ॲडव्होकेट राजगुरु.... यांनी सिटी हॉस्पिटलचा सावळा गोंधळ उघड्यावर आणला....शेजारी सायकिॲट्रिस्ट दिवाणांचा फोटो....अपुऱ्या ज्ञानावर पंचवीस वर्षं प्रॅक्टिस... यांनी शहाण्यांनाही वेडं केलं... (हसत हसत समोर पाहतो. सिस्टर त्याच्याकडे तिरस्काराने पाहत असते. राजगुरु वरमतो. त्याची नजर खाली जाते. आवाज पडतो.)

**राजगुरु :** ...अभी, उद्या संध्याकाळी कोर्ट येईल. जबानी कशी घ्यायची, काय बोलायचं, मी काय सांगितलंय सगळं लक्षात आहे ना?

**अभिजित :** अगदी शब्दन् शब्द लक्षात आहे!

**राजगुरु :** मग निघू मी आता?

**अभिजित :** का रे? बस ना जरा गप्पा मारत....कंटाळा आलाय.

**राजगुरु :** नको अभी. अरे इथं थांबलो....विकी, ही सिस्टर, तू...बोललो. बसलो, की मी...बुद्धिवादी असून भावनाप्रधान होतो...मग मलाही वाटू लागतं तुला जगवलं पाहिजे....जगवलं पाहिजे....मग घरी गेल्यावर, तुझ्या यातना आठवल्यावर मग पुन्हा भानावर येतो....निर्णय घेतो...तुला सुखानं मरू दिलं पाहिजे...सुखानं मरणं...स्वतःच्या इच्छेनं मरणं हा तुझा हक्क आहे!

**सिस्टर :** (ऐकता ऐकता एकदम चमकते. कानोसा घेते. हसते. पुटपुटते) रोझी आलीऽऽ

(बाहेरून रोझीचा आवाज....'ममा, मी येऊ?' नि रोझी येते. थकलेली पण आनंदी.)

**रोझी :** ममा .. (आईला बिलगते.)

**सिस्टर :** रोझी....किती काळवंडलीस? हडकलीस किती ग? (सिस्टर रोझीचा पापा घेते.)

**राजगुरु :** अभी....हीच का ती रोझी?...च्र...च्र...च्र....च्र....सालं, काय एकेकाचं नशीब असतं!

**अभिजित :** रोझी....ताजमहाल पाहिलास?

**रोझी :** अं हं...मी आदिशक्तीचं शिल्प पाहिलं!

**अभिजित :** (आश्चर्याने)....तू आदिशक्तीचं शिल्प पाहायला गेली होतीस? इतक्या दूर...जंगलात?

**सिस्टर :** (हसून) दूर जंगलात म्हणून काय झालं? तुम्ही स्वतःची गाडी दिली होती ना हिला?

**रोझी :** ( तक्रारीच्या सुरात ) कसली ग गाडी यांची ममा? नुसती नावाला एअर कंडिशंड मर्सिडीझ...चांगला लांब रुंद डांबरी रस्ता संपला....नि थांबली जागच्या जागी!

**अभिजित :** आडवाटेनं जंगलात कशी चालणार ती?

**रोझी :** मग काय उपयोग अशा गाडीचा? शेवटी म्हटलं, आपले पाय तेवढे खरे.... जे वाट शोधू शकतात, वाट काढू शकतात....मग पुढे चालतच गेले...!

**अभिजित :** ( थक्क होत )....रोझी, तू दहा मैल चालत गेलीस?

**रोझी :** हो अंकल....पहिल्यांदा मैलभर कशीबशी त्या जंगलातनं, डोंगरातनं चालत गेले....मग पुढे चालवेच ना...म्हणून रडत रडत दगडावर बसले....ममा, मला वाटलं, कांय उपयोग या आयुष्याचा? साधं...दहा मैल चालता येत नाही...पण ममा, समोरच्या झाडावर एक चिमणी घरटं बांधत होती....साधं घरटं बांधायला किती त्रास पडतो ग तिला? हात नाहीत, पाय नाहीत....आणि मूठभर जीव तिचा....तरी पण ती आपल्या पिल्लांसाठी इवल्याशा चोचीनं एवढं मोठं घरटं बांधते...आपल्या शेजारच्या फांदीवरली चिमणी...चार पिल्लं...भुकेली....नि ती सारखी दाणे टिपून टिपून आणत होती....पिलांना भरवत होती....मिनटामिनटाला खेपा मारत होती....किती कष्ट ग छोट्या जिवाला?....तिला पाहिलं ममा, नि डोक्यातून मरणाचा विचारच निघून गेला...

**सिस्टर :** ( घाबरून ) रोझी, तू मरणाचा विचार करतेस?

**रोझी :** ( सहजपणे ) नेहमी नाही ग...पण शाळेला सुट्टी असली....घरात मी एकटी खिडकीशी बसलेली असले की पाहते, खाली बाकीच्या मुली झिम्मा-फुगडी खेळत असतात...कोणी कोणी त्यांच्या बॉयफ्रेंडबरोबर फिरायला जात असतात....तेव्हा वाटतं ममा, अशा पांगळ्या पायानं कशासाठी जगायचं? त्या ऐवजी खिडकीतून उडी टाकून जीव द्यावा!

**सिस्टर :** रोझी ऽऽ

**रोझी :** पण ममा त्या चिमणीला नि पिलांना पाहिलं....नि कविता आठवली... मृत्यू ते जन....

> **मृत्यू ते जन वाहतात...परी ते, भोगास वैतागुनी.**
> **मृत्यो येऊ नको असे म्हणती, सारे परंतू मनी**
> **मी ही सूपातलाच कण त्या, जाते न जाते टळे.**
> **मृत्यो येऊ नको असे म्हणितो, परि ते ना स्वार्थ बुद्धीमुळे!**

आयुष्यातल्या कष्टांना, दुःखांना कंटाळून प्रत्येकाला वाटतं मरून जावं. पण

सर्वजण मनात मरणाला येऊ नको म्हणत असतात. जरी मृत्यू अटळ असला तरी. कारण,

**पाहोनी चिमणी पिला, भरवते, आणोन चारा मुखी.**
**आपोआप मनात बोल उठले, मृत्यो येऊ नको की .. '**

ममा, ती चिमणी मेली, तर ती पिल्लं कशी जगतील ग ? अन् ती पिल्लं मेली, तर त्या चिमणीनं कशासाठी जगायचं ग ?....ममा, पांगळी असले तरी मी मरून कसं चालेल ग....माझ्याशिवाय तुला या जगात कोण आहे ग ?

**सिस्टर :** ( तिला कवटाळत )...कोणी नाही ग रोझी. कोणी नाही !

**रोझी :** नि ममा...माझ्या डोक्यातून मरणाचा विचारच निघून गेला...अंगात इतकी शक्ती आली...इतकी शक्ती आली...की पुढलं अंतर कसं केव्हा काटलं लक्षातच आलं नाही...भानावर आले तेव्हा आदिशक्तीसमोर उभी होते !

( भारावलेला राजगुरु चोरून रुमालाने डोळे पुसतो. आणि भावनाप्रधान नसल्याचे उसने अवसान आणून विचारतो. )

**राजगुरु :** ( हसत ) रोझी, अग ते अर्धवट शिल्प पाहून तुला काय मिळालं ?

**रोझी :** खूप काही मिळालं ! पूर्ण झालेला ताजमहाल पाहिला असता....तर तो पाहूनच संपला असता. पण....आदिशक्तीचं शिल्प पाहिलं...नि पाहातच राहिले...इतकं सुंदर शिल्प...याचा चेहरा कसा असेल ?...नि माझ्यात एक शिल्पकार जागा झाला....असंच असतं. अजिंठ्याची रंग उडालेली, जुनी झालेली चित्रं पाहाताना आपण विचार करत राहतो...यात चित्रकारानं कोणता रंग भरला असेल ?...नि आपल्यात एक चित्रकार जागा होतो ! ( अंतर्मुख होत ) अंकल, आदिशक्तीचं शिल्प पाहिलं नि मला कळलं... माणसाच्या ज्ञानाला अपूर्णता आहे, म्हणून माणसाच्या आयुष्याला पूर्णत्व आहे. या विश्वाचं संपूर्ण ज्ञान आपल्याला झालं तर...आपण कोण असू ?... एका मोठ्या यंत्रातला एक छोटासा खिळा....! पण या अथांग विश्वाचं ज्ञान आपल्याला नाही....म्हणून ते घ्यायला आपण ज्ञाते झालो आहोत. आणि आपण ज्ञाते आहोत म्हणून आपण या विश्वापेक्षा मोठे आहोत ...

**अभिजित :** ( हसत ) म्हाताऱ्यासारखं काय बोलतेस ? तुला शिल्प कसं वाटलं सांग !

**रोझी :** ( भानावर येत ) फार छान...शब्दांत सांगताच येणार नाही. अर्धं शरीर पुरुषाचं....अर्धं शरीर स्त्रीचं...आणि इतकं जिवंत...तिच्या स्तनाकडे पाहाताना वाटायचं...खरंच यातनांचा झरा वाहतोय....नि त्याच्या हातभर छातीकडे पाहाताना वाटायचं....खरंच हा छाती फुगवून गर्वानं समोरच्या सूर्य-ताऱ्यांकडे पाहातोय....नि त्या....शिल्पाचे सहस्रबाहू असे उभारलेले...की

वाटत होतं, आता हजार हातांनी ते सगळ्या विश्वाला कवेत घेतील! ....पण अंकल, तुम्ही आदिशक्तीचा चेहरा कसा खोदणार होता ?

**अभिजित :** तुला काय वाटतं ?... कसा खोदणार होतो ?

**रोझी :** मला वाटलं.... तशी मी स्केचेस् काढलीत....

(स्केचेस दाखवते... दरवेळी अभी अंहं... असा नाही.... असा नाही म्हणतो... स्केचेस संपतात.)

**अभिजित :** रोझी, तू तर सगळे अनेक तोंडांचे.... अक्राळविक्राळ... पुरुषी चेहेरे काढलेस ? आदिशक्तीचा चेहरा कसा आहे माहितीय ?

**रोझी :** कसा आहे ?

**अभिजित : द्विधाकृतात्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।**

**अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत्प्रभुः ॥**

परमेश्वरानं स्वतःचा आत्मा स्त्री आणि पुरुष देहात विभक्त केला... आणि मग स्त्रीच्या रूपात चराचर विश्वाला जन्म दिला. म्हणून आदिशक्तीचा चेहराही स्त्रीसारखाच आहे.

**रोझी :** ओह्... किती सुंदर असेल नाही तो ? अंकल, अडीचशे फूट उंचीच्या उभ्या उंच कातळात तुम्ही एवढं प्रचंड शिल्प कसं काय खोदलंत हो ?

**अभिजित :** रोझी,... हा विषय नको. मनाला यातना होतात.... बारा वर्षं खपून खोदलेलं हे शिल्प, आयुष्याच्या हिशोबात दोन वर्षं कमी पडली म्हणून अपुरं राहणार आहे...

**रोझी :** नाही राहणार अपुरं... तुम्हीच पूर्ण कराल....

**अभिजित :** (विषय बदलत) तुझ्या तोंडात साखर पडो. उद्यापासनं तुझी शाळा ना ?

**रोझी :** अं...हं...उद्यापासून स्पोर्टस कॉम्पिटीशन. ज्यात मला भाग घेता येत नाही... उद्या मुलींच्या धावण्याच्या स्पर्धा आहत.

**अभिजित :** त्यात भाग घ्यायला तुला कोणी बंदी केलीय ?

**रोझी :** बंदी नाही केली.... पण पांगळ्या पायांनी मी शर्यतीत कशी धावणार ?

**अभिजित :** पांगळ्या पायांनाच शर्यतीची गरज असते रोझी. तू भाग घे. पहिली आलीस तर मी तुला शंभर रुपये बक्षीस देईन.

**रोझी :** इतर धडधाकट मुलींत मी पहिली कशी येईन ?

**अभिजित :** का नाही येणार ? अग पुढून पहिली नाही, पण शेवटून पहिली तर येशील ना ?...रोझी, माणसानं शर्यतीत भाग घ्यायचा...तो केवळ जिंकण्यासाठी नाही....धावण्यासाठी. प्रगतीसाठी...!

**रोझी :** ओके अंकल. मी घेते उद्या शर्यतीत भाग. आता जाऊ ?....(हसून) घरातल्या घरात धावण्याची प्रॅक्टिस करायचीय...

**अभिजित :** विश यू ऑल द बेस्ट...सिस्टर जा हिला खालपर्यंत सोडून ये. ( रोझी स्केचेस तिथेच विसरून सिस्टरबरोबर जाते नि राजगुरु सतापून बोलू लागतो. )

**राजगुरु :** अभी, काय नीच घाणेरडा माणूस आहेस तू ?....शंभर रुपयांचं आमिष दाखवून एका पांगळ्या मुलीला पळायला लावतोयस तू ? ( तोच रोझी परतते. दरवाजातच थबकते. )....अरे, जन्मजात पांगळी मुलगी ही.. ती सिस्टर, आई म्हणून तिचा भार वाहतीय. मुलगी पांगळीय म्हणून खस्ता खातीय...ही मुलगी साधं सामान्य मुलींचं जीवन जगायला नालायक आहे. हिला बाप नाही. ही गरीब आहे ही पांगळी आहे. सुंदर, हुशार असून....एखाद्या धडधाकट मूर्ख आणि कुरुप मुलींचंही आयुष्यही ही जगू शकणार नाही......आत्ता ती जगतीय ती केवळ कवितांवर...ज्या कवितांना वास्तवात काडीचीही किंमत नाही...हिला धावायला सांगून, वास्तवात आणून....तू हिच्या कविता नष्ट करतोयस...? घाणेरडा....घाणेरडा माणूस आहेस तू....

( बोलता बोलता थबकतो. पाहातो. खालच्या मानेने, खिन्न मनाने रोझी येते. स्केचेस उचलते....नि खालच्या मानेने....पण निराश मनाने चालू लागते.... तिला जाताना पाहून राजगुरु, अभिजित दोघेही स्तब्ध......नि फक्त छिन्नीचे 'खण खण' आवाज. अधूनमधून सुरुंगांचे 'बूऽऽम् बूऽऽम्' ध्वनी... हळूहळू अंधार. )

## अंक दुसरा - प्रवेश पांचवा

( संध्याकाळची वेळ. अभिजितच्या रूममधे एक वॉर्डबॉय घाईघाईने खुर्ची आणून ठेवतो. पाठोपाठ टेबल आणून ठेवतो.... परत जातो आणि चार पाच फोल्डिंगच्या खुर्च्या आणून भराभरा उघडून मांडतो आणि अभिजितच्या खुर्चीमागे जाऊन उभा राहतो.... विकी, राजगुरु, सिस्टर, रोझी.... एका मागोमाग येतात. खुर्च्यांवर बसतात...मग एक चोपदार येतो. न्यायाधिशाच्या टेबलामागे उभा राहतो.... )

**चोपदार :** होशीयार ऽऽ होशीयार.

( सगळेजण सावरून बसतात. जज्ज येतो. निर्विकार चेहऱ्याने खुर्चीत बसतो. )

**चोपदार :** शिल्पकार अभिजित हाजीरी है ऽऽऽ

( वॉर्डबॉय अभिजितची खुर्ची न्यायाधिशासमोर नेतो. )

**अभिजित :** युवर ऑनर, आपल्या सन्मानासाठी मी उभा देखील राहू शकत नाही, याबद्दल माफी मागतो.

( न्यायाधीश यंत्रवत एकदा अभिजितला न्याहाळतो...मग )

**न्यायाधीश :** वादीची एकंदर शारीरिक विकलांग अवस्था पाहता....नि अपंगत्व लक्षात घेऊन,.... कोर्ट वादीला खुर्चीवर बसून जबानी द्यायला परवानगी देत आहे...

**अभिजित :** थँक्यू युवर ऑनर...

**न्यायाधीश :** वादी शिल्पकार अभिजित, प्रतिवादींचे जबाब, म्हणणं तुम्ही पूर्णपणे वाचलंत ?....

**अभिजित :** येस युवर ऑनर !

**न्यायाधीश :** त्यावर तुमचं काय म्हणणं आहे ?

**अभिजित :** युवर ऑनर, स्वतःच्या हाताचा, ज्ञानाचा, अधिकाराचा जे फक्त गैरवापरच करतात...त्यांच्याविषयी मी काय म्हणू शकतो ?

**न्यायाधीश :** प्रतिवादीचं म्हणणं असं आहे, तुम्ही आजारामुळे मनानं दुर्बळ झाले आहात ?

**अभिजित :** युवर ऑनर, मी मनानं दुबळा असतो...तर अशा विकलांग अवस्थेत वकिलाला बोलावून... प्रतिवादींविरुद्ध कोर्टात अपील करू शकलो असतो ?

**न्यायाधीश :** ( लिहून घेत ) प्रतिवादींचा आणखी असा एक दावा आहे की, तुम्ही मनानंच निराशावादी आहात !

**अभिजित :** ( हसून ) युवर ऑनर, मी जर निराशावादी असतो, तर अडीचशे फूट उंचीच्या काळ्याकभिन्न कातळात आदिशक्तीचं शिल्प बारा वर्षे खोदत राहू शकलो असतो ?

**न्यायाधीश :** प्रतिवादींचा आणखी असा दावा आहे की, तुमचा माणसाच्या प्रयत्न-वादावरला विश्वास उडाला आहे...

**अभिजित :** युवर ऑनर, मी जर प्रयत्नवादी नसतो, तर जिवाचा धोका स्वीकारून दुसऱ्या पद्धतीनं स्वतःवर उपचार करून घेण्यासाठी....ही दाद मागण्याची धडपड केली असती ?

**न्यायाधीश :** जर तुम्ही प्रयत्नवादी आहात....तर डॉक्टर विकी कपूर आणि सिस्टर डिसिल्व्हा यांच्या तुम्हाला बरं करायच्या प्रयत्नाला साथ का देत नाही ?

**अभिजित :** कारण हे मला बरं करायचे प्रयत्नच करत नाहीत....सिस्टर डिसिल्व्हा ओव्हर टाईम मिळतो म्हणून फक्त अहोरात्र माझ्या सेवेचं नाटक करते.

**सिस्टर :** ( उठून ओरडते )...ओव्हर टाईमसाठी नाही....ओव्हर टाईमसाठी नाही....

**न्यायाधीश :** ( हातोडा आपटत ) ऑर्डर...ऑर्डर....शांतता कोर्ट चालू आहे.

**अभिजित :** आणि डॉक्टर विकी कपूर, ज्यांना माझे डॉक्टर म्हणून आज एवढी प्रसिद्धी...प्रतिष्ठा....मिळाली आहे....जी प्रतिष्ठा उद्या खाजगी प्रॅक्टिस कर-ण्यासाठी त्यांच्या उपयोगी पडणार आहे...ती गमवायची नाहीय आणि

गमवू नये म्हणून, स्वतःचं ज्ञान कमी पडूनही ते मला इतर डॉक्टरांकडून, वैद्यांकडून, हकिमांकडून उपचार करून घेण्यास आडकाठी करत आहेत. त्यांना स्वतःच्या ज्ञानाचा खोटा अहंकार आहे !

**न्यायाधीश :** या व्यतिरिक्त तुम्हाला आणखी काही सांगायचं आहे ?

**अभिजित :** येस युवर ऑनर... माझ्या पायांना गँगरीन झालं. कारण, माझ्या रक्तवाहिन्या चालू राहण्याची नीट खबरदारी घेतली नाही सिस्टर डिसिल्व्हाने ! त्या ड्यूटीवर असताना कादंबऱ्या वाचत, गाणी ऐकत,....तुम्ही इथली पुस्तकं, कॅसेटस् पाहू शकता....आणि डॉक्टर विकी कपूर....जे मी जगू शकेन अशी हमी देऊ शकत नाहीत....ते मात्र मी बाहेर गेलो तर मरीन असं धमकावतात. इतर पद्धतीनं, इतर डॉक्टरांकडून औषधोपचार करून घेण्यास मला परवानगी देत नाहीत, मला आडकाठी करत आहेत. ( जबानी संपते. )

( अभिजितची जबानी संपते. कोर्ट थोडा वेळ विचार करते. घड्याळाची टिक टिक वाढते. कोर्ट कागदावर निकाल लिहिते आणि घड्याळाची टिक टिक थांबते. पिनड्रॉप सायलेन्स. )

**न्यायाधीश :** ( कागद वाचू लागतो. ) सर्व साक्षीपुरावे पाहता....कोर्ट या निर्णयाला आलं आहे की, प्रतिवादींची मुख्य भिस्त ज्या साक्षीवर होती....ती सायकिॲट्रिस्ट दिवाण यांची साक्ष पूर्ण चुकीची आणि अज्ञानमूलक होती ! जरी सायकिॲट्रिस्ट दिवाण यांनी बऱ्याच पदव्या मिळविल्या असल्या आणि बरीच वर्षं प्रॅक्टीस केली असली, तरी स्वतःच्या विषयातलं त्यांचं ज्ञान अत्यंत बेताच व कमी दर्जाचं आहे...तेव्हा यापुढे अशा केसेसमधे त्यांची साक्ष कोणत्याही कोर्टानं ग्राह्य धरू नये....

त्याचबरोबर कोर्ट याही निर्णयाला आल आहे की, प्रसिद्धीसाठी आणि स्वतःच्या ज्ञानाच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी डॉक्टर विकी कपूर यांनी शिल्पकार अभिजित याचा एक प्रकारे अनन्वित छळच केलेला आहे...ज्यामुळे वादीस स्वतःचा एक पाय गमावण्याची वेळ आली आहे....डॉक्टर कपूर यांचं हे वर्तन त्यांच्या वैद्यकीय पेशास अशोभनीय आणि वैद्यकीय नीतीस सोडून आहे. वैद्यकीय क्षेत्रात अशी अनीती वाढणं, हे समाजाच्या दृष्टीनं अत्यंत चिंतेचं व धोक्याचं आहे. तरी कोर्ट सरकारला अशी सूचना करते की, डॉक्टर कपूर यांच्या या वर्तनाची चौकशी करून सरकारनं त्यांच्यावर कठोर कारवाई करावी....आणि कोर्ट प्रतिवादी, सिटी हॉस्पिटल आणि डॉक्टर विकी कपूर यांना हुकूम देते की, स्वतंत्रपणे स्वतःवर उपचार करून घेण्यासाठी वादी शिल्पकार अभिजित यास त्यांच्या घरी जाऊ द्यावं. डॉक्टर कपूर काही म्हणायचं आहे ?

**विकी :** ( खिन्नपणे ) काही नाही....उद्या सकाळी नऊ वाजता शिल्पकार अभिजित यांना घरी पोचवण्यात येईल.

( कोर्ट उठते. रोझी स्फुंदायला लागते. अभिजितच्या चेहऱ्यावर आनंद. राजगुरु वेड्यासारखा टाळ्या वाजवत असतो. रोझी उठते आणि निघून जाते. तिला जाताना पाहून राजगुरु भानावर येतो. क्षणभर भ्रमिष्टासारखा इकडे तिकडे फिरतो आणि येऊन पटकन विकीचे दोन्ही खांदे घट्ट पकडत त्याला हलवत विचारतो.. विकी निश्चल. )

**राजगुरु :** ....विकी, काय करून बसलो रे मी ! काय करून बसलो... ? स्वतःचा बुद्धिप्रामाण्यवाद...अत्यंत रॅशनल थिंकिंग सिद्ध करायला....माझी मिजासखोर बुद्धी....कायदेपांडित्य....काय करून बसलो.... ( अंगावरचा कोट खाली जमिनीवर आपटतो आणि रडत रडत ) विकी....इतक्या वाईटरीत्या कधीच कोणतीही केस मी हरलो नव्हतो....कधीच हरलो नव्हतो.... ( भानावर येतो. ) विकी, चल....आत्ता आपण हायकोर्टात रिट पिटीशन करू...मी तुझी फाईल घेतो....होऊ दे माझी छी : थू....स्वतःचीच आर्ग्यूमेंट्स मी खोटी पाडून दाखवीन...अवघड नाही रे...माझी आर्ग्यूमेंट्सच खोटी होती....खरं आणि खोटं, चूक आणि बरोबर यात खूप फरक आहे. एखादी चूक गोष्टही बरोबर असू शकते....डॉक्टर दिवाण आणि तू खोटं पण बरोबर बोलत होता....

**विकी :** हायकोर्टात जाऊन काय उपयोग....मांडीखाली सडला होता तो पाय आता मांडीपर्यंत सडलाय....हायकोर्टात जिंकेपर्यंत त्याचं शरीरदेखील सडायला लागेल....

**राजगुरु :** असं ? चल घे...याला आत्ता घे ऑपरेशन टेबलावर....कापून टाक त्याचा पाय....( आणि टाळ्या वाजवत हाक मारतो.) ए...वॉर्डबॉय-वॉर्डबॉय ( आणि दरवाजाशी असलेला वॉर्डबॉय पुढचे न ऐकताच धावत स्ट्रेचर घेऊन येतो )

**विकी :** ऑपरेशन करू ? बेकायदेशीररीत्या ? कोर्टाचा हुकूम तोडून

**राजगुरु :** कोर्ट गेलं खड्यात ! अर्धे न्यायाधीश तर वकिली करता येत नाही म्हणून न्यायमूर्तींच्या नोकऱ्या पकडतात. त्यांच्यापेक्षा कायदा मला जास्त कळतो. कायदा कोळून प्यालोय मी...मी तुला हमी देतो...तुझ्या केसाला धक्का लागू द्यायचा नाही मी !

**विकी :** हातात बेड्या पडल्या तरी मला फिकीर नाही रे ! पण ऑपरेशन काही मी एकटा करू शकत नाही...आणि अशा बेकायदेशीर ऑपरेशनसाठी मला साथ कोण देईल....

**सिस्टर :** ( पुढे होत.) डॉक्टर, मी देईन साथ. तिन्ही नर्सेसची कामं मी एकटी– करेन....पूर्वी इमर्जन्सी केसेसमध्ये केलीयत एक दोनदा मी एकटीनं अशी कामं !

**वॉर्डबॉय :** ( सरसावत ) साहेब, आपण जी जमेल ती हेल्प करू.

( विकी हसून वॉर्डबॉयची प्रेमाने पाठ थोपटतो. )

**विकी :** सिस्टर, तिघींची कामं तू एकटी करशील ?....पण अॅनेस्थेशिया कोण देईल ? नि या बेकायदेशीर ऑपरेशनसाठी ऑपरेशन थिएटर, इक्विपमेंटस् कोण वापरू देईल ? आता फार उशीर झाला राजगुरु, आता फक्त तू एकच करू शकतोस ?

**राजगुरु :** काय करू शकतो ?

**विकी :** काय....( आवाज चढवत ) जा...त्या न्यायमूर्तीला जाऊन सांग...... हातात तराजू आहे...म्हणून फार तर माणसांना शिक्षा करा....पण माणसांच्या नीतीमत्तेची उठाठेव करू नका......तुमच्या कागदी कायद्यापेक्षा माणसांची नीतीमूल्यं मोठी असतात......नि त्या आंधळ्या न्यायदेवतेपेक्षा माणसांची डोळस सदसद्विवेकबुद्धी मोठी असते....( पडल्या आवाजात ) राजगुरु.... मी याला जगवू पाहात होतो. तू मरू देऊ पाहात होतास....' सत्यमेव जयते ' नुसतं म्हणायचं....प्रत्यक्षात तू जिंकलास....मी हरलो. ( निघून जातो. पाठपोठ राजगुरु धावतो. )

**राजगुरु :** नाही विकी...तू हरणार नाहीस....तू हरणार नाहीस...

( अंधार. छिन्नी सुरुंगांचे संमिश्र आवाज. प्रवेश संपतो. )

## अंक दुसरा — प्रवेश सहावा

( सकाळची वेळ. राजगुरु अभिजितच्या सामानाची बांधाबांध करीत आहे. सिस्टर मात्र रूममधे नाहीय. हातात औषधांची खोकडी घेऊन विकी येतो. विकीच्या चेहऱ्यावर संपूर्ण नाराजी. )

**अभिजित :** ( हसून ) गुडमॉर्निंग विकी...

**विकी :** ( तुटकपणे )...ही औषधं. घरी गेल्यावर विचार बदलला, जगावंसं वाटलं, तर ही औषधं घ्यायची. ही रूम तुझ्या नावेच राखून ठेवतोय. तू जिवंत असेपर्यन्त ! गुडबाय...

**अभिजित :** विकी, रागावलास ?

**विकी :** का नको रागवू ? या हॉस्पिटलला प्रसिद्धी मिळावी, मला नावलौकिक मिळावा, माझा कामधंदा वाढावा म्हणून तुला सक्तीनं डांबून ठेवल्याचा आरोप केलास माझ्यावर.

**अभिजित :** ( अपराधी स्वरात ) सॉरी विकी. जगण्यासाठी जशी माणसं अगतिकपणे खोटं बोलतात, पापं करतात.. त्याचप्रमाणे मीही मरणासाठी खोटं बोललो.... क्षमा कर.

**विकी :** मरणाऱ्या माणसाला क्षमा करण्यापलीकडे मी काय करू शकतो ?
( जाऊ लागतो. )

**अभिजित :** थांब विकी, शेवटची निरवानिरव करतोय... तुझी जरूरी आहे.

**राजगुरु** : अभी, सामान पॅक झालं...

**अभिजित** : आता माझं मृत्युपत्र करायचं....

**राजगुरु** : ते पूर्वीच तयार केलंय...

**अभिजित** : त्यात थोडासा बदल करायचाय....

**राजगुरु** : काय ?

**अभिजित** : माझ्या मृत्यूनंतर... माझ्या पैशांपैकी दहा लाख रुपये डॉक्टर विकी कपूर यांना अपंग मुलांसाठी खास वॉर्ड काढण्यासाठी देणगी म्हणून देण्यात यावेत.... (राजगुरु पॅडवर लिहून घेऊ लागतो....) तसंच माझ्या मृत्यूनंतर मला 'वेडा' ठरवणाऱ्या 'शहाण्या' डॉक्टर दिवाणांना एक लाख रुपये. कुमारी रोझी डिसिल्व्हा हिला अमेरिकेला जाऊन स्वतःवर उपचार करण्याप्रीत्यर्थ दोन लाख रुपये देण्यात यावेत. या व्यतिरिक्त माझ्या रॉयल्टीतून दरमहा हजार रुपये सिस्टर डिसिल्व्हा हीस पेन्शन म्हणूत तहहयात देण्यात यावेत.
(राजगुरूंचे लिहून संपते. अभिजित गप्प.)

**राजगुरु** : बस् ? सगळ्यांना पैसे वाटलेस.... मला काहीच नाही.

**अभिजित** : नाही. दिडकीदेखील नाही.... कारण, राजगुरु तुझ्याकडे माणसाचा मेंदू आहे, माणसाची बुद्धी आहे.... पण माणसाचं हृदय नाही .. अरे, अशील फी देतोय म्हणून त्याच्यासाठी तू मरणदेखील सहजपणे मागितलंस .. आणि आपण केस जिंकावी म्हणून एका सज्जन डॉक्टरवर धादांत खोटे आरोपदेखील केलेस.... तू न्याय आणि माणूस यांच्यातला दुवा नाहीस... दलाल आहेस ! दलाल ! !
(राजगुरु ओशाळतो.)

**विकी** : मी निघू ? ॲम्ब्यूलन्स अर्ध्या तासात येईल !

**अभिजित** : नीघ...जाताना सिस्टरला पाठवून दे.

**विकी** : ती आत्ता येणार नाही.

**अभिजित** : अरे, मला तिला पैसे द्यायचेत....

**विकी** : कुबेराचा खजिना तिच्या पायाशी ओतलास तरी ती आत्ता यायची नाही !

**अभिजित** : का ?

**विकी** : रात्रीपासून ती आपल्या मुलीच्या उशाशी बसून आहे.

**अभिजित** : का ? रोझीला काय झालं ?

**विकी** : झालं काही नाही...तिनं आत्महत्त्येचा प्रयत्न केला. झोपेच्या गोळ्या खाल्ल्या !

**अभिजित** : काय ?

**राजगुरु** : व्हॉट नॉनसेन्स ?

**विकी** : नॉनसेन्स काही नाही. तिनं अगदी सेन्सिबली विचार केला. अभीप्रमाणेच

विचार केला. आपल्या जगण्यात काय अर्थ आहे? आपण अशा लुळया पांगळ्या....!

**अभिजित :** आता कशीय ती?

**विकी :** वाचवलं तिला मी! धोक्यातनं बाहेर काढली...पण आत्महत्येच्या विचारापासून तिला प्रवृत्त नाही करू शकलो.

**अभिजित :** तिला इकडे आण....मी काढतो तिच्या डोक्यातलं आत्महत्येचं खूळ.

**विकी :** (तुच्छतेने) स्वत: मरू इच्छिणारा दुसऱ्याला जगण्याची प्रेरणा देणार?

**अभिजित :** अशक्य वाटतं? विकी, मृत्यूच्या पदराआडच जीवन फुलत असतं.... आण....तू तिला इकडे आण. (विकी जातो. अभिजित गहिवरतो.) सोळा सतरा वर्षांची पोर...मृत्यूचा विचार करते?....राजगुरु एवढा नावलौकिक, पैसा, प्रतिष्ठा असतानाही हातपाय निकामी झाले तर मला जीवन, हे जग उदास, भकास निरर्थक वाटू लागलं....याउलट ही कोवळी पोर...गरीब... बाप नसलेली...जन्माची पांगळी...पण ती जगाकडे किती आनंदानं पाहात होती. कसलीही खंत न बाळगता...तिच्या हसऱ्या डोळ्यांकडे पाहिलं की बायबलच्या वाक्याची प्रचीती यायची!

**राजगुरु :** कोणत्या वाक्याची?

**अभिजित :** बायबलमधे लिहिलंय.... आस्क द चाइल्ड.... हाऊ ब्यूटिफुल द वर्ल्ड इज! ....लहान मुलाला विचारा... जग किती सुंदर आहे... टकामका टकामका जगाकडे पाहताना, ते मूल या जगाला समजावून घेत असतं! या जगावर प्रेम करीत असतं! आपण लहान आहोत. आपल्याला धड चालता बोलताही येत नाही.... याची त्याला थोडीदेखील खंत नसते. लहान मुलाच्या नजरेनं आपण जगाकडं पाहिलं तर आपण कधी दु:खी होत नाही! कष्टी होत नाही! निराश होत नाही!.... आस्क द चाइल्ड हाऊ ब्यूटीफूल द वर्ल्ड इज! (एक वॉर्डबॉय पलंग ढकलत आत आणतो. पलंगावर रोझी निश्चेष्ट पडली आहे. पलंगावरच तिच्या दोन्ही कुबड्या पडल्या आहेत. सोबत छिन्नी, हातोडा आणि स्केच बुक.... तिच्याबरोबर सिस्टर आणि विकी. विकी पुढे होऊन अभिजितची खुर्ची तिच्या पलंगासमोर सरकवतो.)

**अभिजित :** (मृदू स्वरात) रोझी उठून बसतेस?
(रोझी खालच्या मानेने पलंगावर कशीबशी उठून बसते.) रोझी इकडे पहा माझ्याकडे... (रोझी नजर चुकवत त्याच्याकडे पाहते.) चेहऱ्याकडे नको, माझ्या डोळ्यांत पहा...जे मला बोलता येणार नाही, ते माझे डोळे बोलतील.... जसे कालपर्यंत तुझे डोळे बोलत होते....

**रोझी :** (भरल्या आवाजात) काय?

**अभिजित :** (आवेगाने) रोझी, कळीनं फुलायच्या आधीच झडायचं नसतं...

**रोझी** : ( स्फुंदत ) .. मी कुठं झडली जातीय.... मी तर खुडली जातीय. निरर्थक जीवन जगतीय. ज्या जगण्याला काही कारणच नाही.

**अभिजित** : रोझी, प्रत्येकाला जगायला काहीतरी कारण लागतं हे खरंय ! पण फक्त स्वतःच्या जगण्याला कारण शोधणं, हा तर आप्पलपोटा विचार झाला ! विसरू नकोस. कधी कधी आपलं आयुष्य हेच दुसऱ्याच्या जगण्याचं कारण असतं ! ती चिमणी कोणासाठी जगत होती ?... ती पिलं कोणासाठी जगत होती ?... रोझी. तुझी ममा हे गरीब विधवेचं जीवन जगतीय.... केवळ तुझ्या कारणानं. तू मेलीस तर तिच्याही जगण्याला अर्थ रहाणार नाही..

**रोझी** : ( रडत )....पण मी कशी जगू अंकल ? माझा काही गुन्हा, पाप नसताना देवानं मला जन्मतःच पांगळी केलं. माझ्या पापांना, मी पापा म्हणून हाक मारायच्या आधीच माझ्यापासून ओढून नेलं....आणि जिथं हे जग ट्रिपच्या आनंदासाठी मला देखील बरोबर नेत नाही, तिथं मला सांभाळेल तरी कसं ?.... म्हणून, म्हणून तर फक्त माझ्या ममाला, माझं ओझं उचलत हे काबाडकष्टाचं, विधवेचं एकाकी आयुष्य जगायला लागतंय...

**सिस्टर** : ( स्फुंदत ) नाही ग रोझी तू आहेस तोपर्यंत मी एकाकी नाही ग ! तू गेलीस तर मात्र मी एकटी पडेन....

**रोझी** : ठाऊकाय ग ममा मला, पण या पांगळ्या पायांनी मी कशी ग जगू शकेन ?

**अभिजित** : ( आवाज चढवत ) रोझी, तू पांगळी आहेस. म्हणूनच जगू शकशील ! म्हणूनच जगायचं !! म्हणूनच जगशील ! अग तुझा काही गुन्हा, काही पाप नसताना . काय अधिकार होता, त्या बेशरम परमेश्वराला तुला पांगळं बनवून जन्माला घालायचा ? सृष्टिकर्ता आहोत म्हणून फार माज चढलाय का त्याला ? जुलमी, अत्याचारी झालाय का तो ?...या पृथ्वीच्या पाठीवर माणसांना उपाशीपोटी भिकेकंगाल ठेवून...हिरे, मोती, सोनं, चांदी मात्र त्यानं पृथ्वीच्या गर्भात दडवून ठेवलं काय ? इतके सुंदर, तारे, नक्षत्र, ग्रहगोल असताना माणसाला मात्र त्यानं पृथ्वीवर बंदिवासात टाकलंय काय ?... मग ठीकय ! आपण माणसंच त्या ईश्वराविरुद्ध बंड करू....त्यालाही आपण दगडात बंदिस्त करून टाकू आणि सांगू चार आण्याच्या नैवेद्यात खूष रहा....आम्ही आमची प्रतिसृष्टी निर्माण करू...आम्ही आमच्या सृष्टीचे ईश्वर बनू.. हे विश्वकर्त्या, तू तुझ्या तेहतीस कोटी देवांसकट तोंड काळं कर...आम्हीच प्रत्येक माणसाचा देव बनवू....जा...आम्ही तुझ्याविरुद्ध बंड करीत आहोत !

**रोझी** : मी ? देवाविरुद्ध बंड करू शकते ?

**अभिजित** : हो रोझी. जशी छोट्या चिमणीमधेही निसर्गाविरुद्ध लढण्याची जीवनशक्ती आहे. तशी ईश्वराविरुद्धही दंड थोपटण्याची आदिशक्ती माणसामधे आहे....त्या हेलन केलरला ईश्वरानं टिंगल करण्यासाठी जन्मतःच आंधळी,

मुकी, आणि बहिरी करून जन्माला घातलं...आणि म्हणाला, आता मिळव मी निर्माण केलेल्या सृष्टीचं ज्ञान ! रोझी, हेलन केलर रडली नाही . तिनं आत्महत्याही केली नाही. ती फक्त हसली. तिनं स्वतःतील, माणसातली आदिशक्ती जागवली....आणि दृष्टी, वाचा, श्रवणशक्ती नसताना इतकं ज्ञान मिळवलं, इतकं ज्ञान मिळवलं....अग नुसत्या वर्तमानाचं नाही, तिनं भूतकाळाचंही ज्ञान मिळवलं....ती प्रकांडपंडित इतिहासकार झाली.. ईश्वरही लाजला ग तिच्यापुढे ईश्वरही लाजला !....रोझी, राजसत्तेविरुद्ध बंड करणाऱ्या क्रांतिकारकापेक्षा....धर्ममार्तंडांविरुद्ध बंड करणाऱ्या सुधारकांपेक्षा....ईश्वराविरुद्ध माणसानं पुकारलेलं बंड हे इतिहासात सगळ्यांत पहिलं क्रांतिकारक, नि चिरंतन बंड आहे...रोझी, तूही तुला पांगळ्या बनवणाऱ्या ईश्वराविरुद्ध बंड पुकार... तुझ्या अंतरात्म्यात दडून बसलेल्या आदिशक्तीला फुंकर घाल....मग बघ तुझ्या मनात ती उतरेल...आणि तुझं मन तिच्या शक्तीसकट इतकी उचल खाईल... इतकी उचल खाईल... की तुझ्या पांगळ्या पायांसकट ते ताठ उभं राहील. (बोलता बोलता स्वतः खाडकन् ताठ उभा राहातो.) आणि त्या ईश्वराला आव्हान देण्यासाठी जेव्हा तू तुझे हात पसरशील (स्वतःचे हात पसरतो.) तेव्हा त्या हातांत सहस्रबाहूंचे बळ येईल... (आणि एकदम ताठ होत शून्यात टक लावून पाहू लागतो.)

**रोझी** : (घाबरून) काय पाहाताय अंकल ! काय पाहाताय ? ?

**अभिजित** : (स्वतःशी) रोझी,...मी पाहातोय त्या आदिशक्तीचा चेहरा....जो आजवर मला कधी दिसलाच नव्हता.

**रोझी** : कसा दिसतो तिचा चेहरा ?

**अभिजित** : मला शब्द त सांगता येणार नाही ग ..

**रोझी** : (स्केचबुक पेन्सिल देत) मग अंकल, काढून दाखवा ना !

**अभिजित** : शून्यातच नजर ठेवून....यंत्रवत स्केचबुक हातात घेऊन रेघोट्या मारता मारता बडबडू लागतो. )....आदिशक्तीचा चेहरा स्त्रीसारखा आहे.... ती सृष्टीची निर्मिती आहे, तिच्या बाहूंप्रमाणेच तिच्या डोळ्यांतही सहस्रभाव आहेत ती वर ईश्वराकडे पाहाताना क्रुद्ध नजरेनं, बंडाच्या भावनेनं पाहाते.... ती जेव्हा अथांग विश्वाकडे पाहाते....तेव्हा तिची नजर शोधक, समजूतदार असते....तेव्हा ती लक्ष लक्ष प्रकाशवर्षे दूर दडलेल्या तारा नक्षत्रांचा वेध घेते...तिची नजर जेव्हा पायाशी जाते नि आदिशक्ती नसलेले दुबळे, अगतिक जीव पाहाते....तेव्हा तिच्या नजरेत वात्सल्य नि मातृत्व उमटते . त्या दुबळ्या जिवांना, छातीशी कवटाळून ती स्तनपान देते...त्यांच्यात चेतना, झुंजण्याची शक्ती निर्माण करते....ती ईश्वराकडे पाहात तोंड उघडते तेव्हा गरजते. अहं ब्रह्मास्मि.... अहं ब्रह्मास्मि मीच ब्रह्म आहे.... मीच ब्रह्म आहे. तीच जेव्हा

अथांग विश्वाकडे पाहाते तेव्हा अंतर्मुख हळुवार आवाजात स्वतःला विचारते. 'को हं ऽऽ को हं ऽऽ ? मी कोण आहे ? मी कोण आहे ?' पण तिची एक मजाय रोझी ! ती जोपर्यंत खाली पाहू शकत नाही तोपर्यंत वरही पाहू शकत नाही....ती जोवर स्वतःशी बोलत नाही.... तोवर तिला ईश्वरावरही गरजता येत नाही...रोझी हा असतो तिचा चेहरा.... ( रोझीच्या हातात स्केचबुक देता देता....शून्यातून वास्तवात येतो )

रोझी, कोणी देव मानो अगर न मानो....कोणी धर्म माना अगर न मानो...प्रत्येकानं या माणसामधल्या, स्वतःमधल्या आदिशक्तीला मानलं पाहिजे....बस...रोझी, याचसाठी प्रचंड विशाल कातळात मी आदिशक्तीचं शिल्प खोदत होतो....जे मैलोन् मैल अंतरावरून माणसांच्या नजरेस पडेल... त्याला जागवेल !....मला नाही पूर्ण करता आलं रोझी...पण हे शिल्प कोणी तरी पूर्ण केलं पाहिजे....कोणीतरी पूर्ण केलं पाहिजे.. कोणी तरी पूर्ण केलं पाहिजे...

( अभिजित खुर्चीत कोसळतो. )

**राजगुरु** : विकी....ऽऽ विकी ऽऽ

( विकी पुढे होतो. अभिजितला पाहतो आणि खिन्नपणे स्वतःच्या अंगावरचा कोट काढून खाली टाकतो. )

**विकी** : राजगुरु....मी हरलो...नाऊ ही इज डेड.

**रोझी** : ( रडक्या आवाजात ) हाउ कॅन ही बी डेड ?....अजून आदिशक्तीचं शिल्प पूर्ण व्हायचंय....!

**विकी** : ( खिन्न हसत ) रोझी....अभिजित मेला नाही....फक्त तो वैद्यकीय दृष्ट्या मेला....ही इज ओनली फिजिकली डेड.. शरिरानं मेला. तो यापूर्वीही होता.... आहे नि राहील...या नाही, तर दुसऱ्या देहात !....रोझी, मरते ती फक्त व्यक्ती. माणूस नाही. माणूस सदैव होता, आहे नि राहील.......हजारो लाखो व्यक्ती मेल्या तरी माणसातली आदिशक्ती कितीही प्रतिकूल परिस्थितीत माणसाला मरू देणार नाही....

( विकीशिवाय सगळे सुन्न होऊन अभिजितच्या देहाकडे पाहतायत. विकी मात्र स्थितप्रज्ञ...विकी रोझीला भानावर आणतो. )

**विकी** : रोझी, तू काळजी करू नकोस...कोण ना कोण तरी ते आदिशक्तीचं शिल्प पूर्ण करेलच....अगं, शेवटी यश माणसाला मिळतं......व्यक्तीव्यक्तींनी फक्त त्यासाठी प्रयत्न करायचे असतात....

**रोझी** : आता मी काय करू डॉक्टर ?

**विकी** : तुझं तूच ठरव....काय घ्यायचं ? ( दोन्ही हात पुढे करतो. एका हातात

झोपेच्या गोळ्या. दुसऱ्या हातात छिन्नी हातोडा.) झोपेच्या गोळ्या.......का छिन्नी–हातोडा ?

(रोझी एकटी धडपडत उठते. कुबड्या खाकेला घेते. पुढे सरते. झोपेच्या गोळ्या घेते. एकवार पाहून दूर फेकून देते. ती छिन्नी–हातोडा उचलून छातीशी कवटाळते....विकी समाधानाने हसतो.......तोच टणटण करीत ॲम्ब्यूलन्सचा आवाज....वॉर्डबॉय येतो.)

**वॉर्डबॉय :** डॉक्टर, ॲम्ब्यूलन्स आली.

**विकी :** बरं झालं. हिला हिच्या घरी पोचवा.

**वार्डबॉय :** रोझी कुठं राहाते ?

**विकी :** दूर जंगलात आदिशक्तीच्या पायाशी....एका झोपडीत! (रोझी निर्धारपूर्वक एकेक पाऊल टाकत वॉर्डबॉयच्या पाठोपाठ चालू लागते.... तिच्याकडे समाधानपूर्वक पाहत विकी कोट उचलतो. अंगावर चढवतो. प्रकाश मंद होऊ लागतो. आणि हिपोक्रेटसची शपथ ऐकू येऊ लागते. कोरसमध्ये "मी प्राणरक्षक देवता अश्विनीकुमारांना साक्ष ठेवून, माझ्या पूर्वसुरींच्या गुरुजनांना, वैद्य जीवक, वैद्य सुश्रुत, वैद्य चरक यांना स्मरून शपथ घेतो की,....

ईश्वराचा अंश असलेला प्रत्येक मानवदेह जगवणं, वाचवणं हाच माझा धर्म आहे....नि याच धर्माचं मी पालन करीन. हे अश्विनीकुमारांनो, आणि माझ्या पूर्वसूरींच्या गुरुजनांनो, जोवर मी माझ्या धर्माचं निष्ठापूर्वक नि श्रद्धापूर्वक पालन करीन...तोवर तुमच्या आशिर्वादानं तुमचीच प्रतिष्ठा.... आत्मशांती नि समाधान मला लाभो." (शपथ चालू असतानाच प्रकाश मंदावत जातो. नि पडदा पडू लागतो.)

॥ **समाप्त** ॥

हे [illegible]
प्र. वि. सं. ... [illegible]
क्र. २९८६३ ता. २६।११।६६
वि. ...[illegible]
IRBK-0121863